वर्ष : सतरावे
मार्च २०२५
अंक : तिसरा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ४८

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

बुद्धिबळाच्या विविध वैशिष्ट्यांचा...
या खेळाच्या इतिहासातील अज्ञात वळणांचा... खेळाडूंच्या अप्रतिम कर्तृत्वाचा...
आणि चित्रपटातून दिसलेल्या बुद्धिबळ क्षेत्राचा मागोवा घेत
बुद्धिबळ जगताची रोचक सफर घडवणारे हे पुस्तक...






‘लैंगिकता’ या मानवी नात्यांतील मूलभूत
पैलूविषयी शास्त्रीय पद्धतीनं भाष्य करत,
उत्तम सहजीवनाचा मूलमंत्र देणारं,
ज्येष्ठांच्या सहजीवनाचं महत्त्व अधोरेखित करणारं
निरंजन मेढेकर यांचं हे आगळंवेगळं पुस्तक...

**देहभान**

**निरंजन मेढेकर**

---

मुग्धा शेवाळकर यांचा
खास छोट्या दोस्तांसाठीचा हा बालकथासंग्रह...
मुलांच्या भावविश्वात घेऊन जाणाऱ्या,
आनंदासोबतच नकळत मूल्यसंवर्धन करणाऱ्या
त्यांच्याच भाषेत अवतरलेल्या
या सुंदर बालकथा....

**छोट्यांचा मोठा प्लॅन**
**आणि इतर गोष्टी**

**मुग्धा शेवाळकर**



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक तिसरा
१५ मार्च २०२५
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :


- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  - *मेंदूतला माणूस* - राजन मनोहर बुटाला / ९
- गाऊ त्यांना आरती - *इंदिरा गांधी* / १३
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / १७
- असे जन्मले पुस्तक!
  *बाय गं...* - विद्या पोळ - जगताप / २३
- आठवणींचा पारिजात
  - *सोयरे जिवलग*
  - सोनाली कुलकर्णी / २७
- क... कवितेचा - दीपाली दातार / ३१
- उद्‌गार -
  *चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे*
  - क्षितिज पटवर्धन / ३३
  *खांदे सुजलेले दिवस*
  - प्रा. सुजाता राऊत / ३५
- राजहंसी पार / ३९
- वाचकांच्या मनातलं... / ४१


या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




भारतीय रंगमंचावरील कर्तबगार रंगकर्मी, दिग्दर्शिका, अभिनेत्री, लेखिका या विविधांगी भूमिकेतील स्त्री-कलावंतांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा वेध... वीस दिशादर्शक प्रश्नांच्या अनुषंगाने सर्जनशील रंगकर्मींचे हे विचार म्हणजे वाचकांसाठीचा समृद्ध ठेवा...

### वीस प्रश्न

संकल्पना आणि संकलन : महेश एलकुंचवार

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. ₹ ५०)

'भीमा ते भारतरत्न' कसा घडला भीमसेनजींचा प्रवास? काय होतं त्यांच्या संगीतसाधनेचं बळ? या प्रश्नांच्या उत्तरासह त्यांचे प्रेरक-रोचक चित्ररूप चरित्र असणारे, खास मुलांसाठीचे हे पुस्तक




### भीमसेन (मुलांसाठी)

मंदार करंजकर, दाक्षायणी आठल्ये

अनुवाद : डॉ. आरती रानडे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



व्यक्तिस्वातंत्र्याच्या कडेलोटावर उभे असणाऱ्या भारतीय समाजाला लोकशाही संस्कृतीची आणि धर्मनिरपेक्षतेची अपरिहार्यता, हुकुमशाहीतील धोके सांगणारे, सशक्त लोकशाहीसाठीचे साक्षेपी चिंतन म्हणजे हे पुस्तक -

### लोकशाही आणि हुकुमशाही

नरेन्द्र चपळगावकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

*स्त्री सर्जनाची धात्री आहे. संतुलित समाज निर्मितीतील तिचे योगदान मोलाचे आहे. प्रस्तुत अंक म्हणजे स्त्री-संवेदनेचा, स्त्री-साहित्याचा यथोचित गौरवोद्गार आहे.*

नमस्कार वाचकहो,

आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण नवा आहे, नित्यनूतन आहे. पण या नवतेचा आपण अनुभव घेतो का? तो आपल्या जाणिवेत उतरतो का? आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या गतिमान यंत्रयुगात थोडी उसंत घेऊन आपण या घटनेचा विचार करतो का? पाहा बरं आपल्याच आत डोकावून...!

हे आज तुमच्याशी बोलायचे कारण म्हणजे, मार्च महिना सुरू झालाय आणि अनेक बदलांना आपल्याही नकळत आपण सामोरे जात आहोत. या संदर्भातच एक मुक्त चिंतन तुमच्यासमोर मांडावे असे मनात आहे. सृष्टीच्या अव्याहत फिरणाऱ्या चक्रातील ऋतुराज वसंताने सृष्टीचे रूप पालटवायला सुरुवात केली आहे. शिशिरातील पानगळ अवघी भुई व्यापून, निष्पर्ण झाडे 'आपुला ठावो न सांडिता' निश्चल उभी नभाकडे बाहू पसरून, मेघमालेची असोशी पुरी होऊन ती परतायला नि बरसायला अजून पुष्कळ अवधी असतानाच फांदीफांदीवरच्या लालस पालवीनं आपलं अस्तित्व दाखवायला सुरुवात केली आहे. आपल्या अस्तित्वाला पुन्हापुन्हा अंकुरवण्याचा कुलधर्म बीज असाही सांभाळतेय. सृष्टी सामोरी जात आहे प्रत्येक नव्या क्षणाला आणि सर्जनाचा सोहळा करत आहे. सर्वनाशक 'काळ'ही लुभावतोय तिच्यावर आणि आपला अवकाश भरून घेतोय तिच्या रसमुग्ध पानाफुलांच्या नवरूपांनी. वसंतात वर्षा नाही. त्याच्या भाळी उन्हाच्या तप्त ज्वाळा. पण त्या साहून आणि झाडांना आपल्या गर्भातील ओल पुरवून भूमी वसंताला बहरवत आहे. ही किमया केवळ सृष्टीच करू शकते. वाचकहो, हा केवळ शब्दविलास नाही बरे! निसर्गातील हे वास्तव लोभस चित्र आहे... आपल्या भवतालातलेच! त्याची मांडणी लालित्यपूर्ण अंगाने केली आहे इतकेच. आपणही हे सारे अनुभवावे नि जगण्याचा उत्सव करावा असे वाटते.

वाचकहो, या सृष्टीकडून मी तुम्हाला घेऊन येत आहे स्त्री-जीवनाकडे; कारण

'स्त्री' हीदेखील प्रतिसृष्टीच! सृष्टीप्रमाणेच तिही सर्जनाचे मूर्त रूप आहे. सर्जनाचा रंग हिरवा असतो हे विशेष. ममता, प्रेरणा, वेदना, प्रतिभा, कल्पना हे सर्जनाचे मूलघटकही स्त्रीलिंगी आहेत. सर्जनाचे तत्त्वच स्त्रैण आहे. पुरुष जेव्हा सर्जनशील असतो, तेव्हा तोही स्त्रैणभावानेच उमलून येतो हे आपण मुळातून जाणले, तर आपल्या हे ध्यानी येईल. उदाहरणच पाहा ना - पु. शि. रेगे यांनी 'छंद' हा पुल्लिंगी शब्द किती सहजतेने 'छांदसी' असा स्त्रीलिंगी करून घेतला आहे. 'वाणी आणि लेखणी'तील ऋजुता जाणते वाचक अनुभवू शकतील. असे असले, तरी सर्जन आणि स्त्री ह्यांचा अन्योन्य संबंध अगदीच घनिष्ठ आहे. उत्क्रांत अवस्थेनंतर समूहाने राहायला लागल्यावर सर्जनाचा मुख्य स्रोत असणाऱ्या शेतीचा शोध स्त्रीनेच आपल्या निरीक्षण व प्रयोगशील वृत्तीतून लावला. सर्जनाची अन्य क्षेत्रंही तिला खुणावत होती. मौखिक वाङ्मयातून तिच्या सर्जनाचा आविष्कार होत राहिला. पुराण काळातील गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा ही स्त्री-अभिव्यक्तीची परिचित उदाहरणे आहेत.

जसजसे तिचे अस्तित्व समाजात ठळक होत गेले, तसतसे तिच्यासमोर नवी आव्हाने आणि संघर्षही उभा राहिला. हक्कासाठी तिला लढावे लागले.

'जागतिक महिला दिन' हे तिच्या संघर्षाचे प्रतीक आहे. तसे पाहता हा मानवी जगतातला सोहळा; पण तोही निसर्गाचा असा सर्जनसोहळा सुरू असतानाच असावा हाही सुयोग म्हणायला हवा. संयुक्त राष्ट्र संघटनेने जरी १९७५ हे 'जागतिक महिला वर्ष' म्हणून घोषित केले असले आणि ८ मार्च हा 'जागतिक महिला दिन' म्हणून जगभर साजरा होत असला, तरी त्याआधीही हा दिवस जगातल्या अनेक देशांत महिला दिन म्हणून साजरा होत होता. मेरी ओल्स्टनक्राफ्ट यांच्यापासून सन १७९२मध्ये सुरू झालेला स्त्री-हक्कांसाठीचा लढा आजही विविध रूपांत सुरू असलेला आपण पाहतो. या प्रदीर्घ काळात स्त्रियांना शिक्षणाचा, संपत्तीचा, मतदानाचा अधिकार मिळाला. आत्मनिर्भर स्त्री हळूहळू स्वत:ला व्यक्त करू लागली. लेखन हाही तिच्या सर्जनाचा अविभाज्य भाग बनला.

साहित्य-इतिहासाचा धांडोळा घेतला, तर आपल्या लक्षात येईल की, मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेत स्त्री-साहित्यिकांचे योगदान अतुलनीय आहे. समाजातील विविध स्तरांतील अनुभव-भावनांचा उत्कट आविष्कार, तसेच स्त्री-जीवनाच्या विविध पैलूंना समर्थपणे शब्दरूप देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य स्त्रियांनी आपल्या साहित्यातून केले आहे. कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र, नाटक, लघुनिबंध आणि समीक्षा अशा विविध साहित्यप्रकारांत त्यांचे मौलिक योगदान आहे. काही प्रातिनिधिक उदाहरणे येथे देता येतील.

वारकरी संप्रदायातील संत जनाबाईंनी *'स्त्री जन्म म्हणोनि न व्हावे उदास'*

म्हणत आपल्या भावनांना शब्दरूप दिले. मुक्ताबाई, बहिणाबाई, सोयराबाई यांसारख्या संतसाहित्यिकांपासून स्त्रीच्या लेखनाभिव्यक्तीला आकार येत गेला. महानुभाव काळातील महदंबेने धवळे लिहिले.

ब्रिटिशकालीन आणि स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ सुरू झाली. या काळात बायजाबाई चौधरी, काशीबाई कानिटकर यांसारख्या लेखिकांनी साहित्याच्या माध्यमातून स्त्रीच्या हक्कांचा जोरदार आवाज उठवला. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुषतुलना' हा ग्रंथ लिहून स्त्री-हक्कांविषयीचे प्रश्न उपस्थित केले. लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्रातून एका स्त्रीचा जीवनसंघर्ष प्रभावीपणे मांडला. सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई, जनाबाई शिंदे आदींनी शिक्षण क्षेत्रातील कार्यानं स्वत:बरोबरच इतर स्त्रियांनाही सर्जनासाठी मोकळे आकाश दिले. दुर्गाबाईंनी लोकसाहित्यापासून ते जागतिक साहित्यापर्यंतचा पैस वाचकांना दाखवला. इरावती कर्वे, प्रतिभा रानडे आदी स्त्री-साहित्यिकांचे द्रष्टे लेखन तसेच संजीवनी मराठे, इंदिरा संत, शान्ता शेळके यांनी निसर्ग, प्रेम यांद्वारे स्त्रीजीवनाचे वेगवेगळे पैलू दर्शविले.

अनेक स्त्री-साहित्यिकांनी आत्मचरित्रे लिहून समाजाला नवा दृष्टिकोन दिला आहे. त्यांचे साहित्य केवळ भावनात्मक नाही, तर वैचारिक आणि बौद्धिकदेखील आहे. या अभिव्यक्तीतून त्यांनी सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकलाय. स्त्री-शिक्षण, विवाहसंस्था, घटस्फोट, आर्थिक स्वावलंबन, राजकीय सहभाग अशा महत्त्वाच्या विषयांवरचे त्यांचे लेखन समाजासाठी दिशादर्शक ठरले आहे. स्त्रियांनी त्यांच्या या अभिव्यक्तीतून स्वत्त्वाचाही शोध घेतलाय. आजच्या डिजिटल युगात तर स्त्री-साहित्यिक ब्लॉग, ई-पुस्तके, वेब साहित्य यांमधूनही मोठ्या प्रमाणावर लिहीत आहेत. स्त्री साहित्यिकांनी आपल्या लेखणीतून मराठी साहित्य अधिक समृद्ध आणि व्यापक केले आहे त्याची ही काहीच उदाहरणे आहेत. सगळाच परामर्श येथे घेणे शक्य नाही.

या स्त्री-साहित्य परंपरेत 'राजहंस'ने पहिल्यापासूनच स्त्री अभिव्यक्तीला उचित स्थान दिले आहे. त्यांचे प्रश्न, कर्तबगारी, संवेदनशीलता समाजासमोर यावी म्हणून स्त्री-चरित्रे, स्त्री-आत्मचरित्रे प्रकाशित केली आहेत. राजहंसच्या पुस्तकसृष्टीत किशोरी आमोणकर, विजया मेहता, सरोजिनी वैद्य, सई परांजपे, सोनाली कुलकर्णी, वीणा गवाणकर, मंगला गोडबोले, मेघना पेठे, शकुंतला परांजपे, विद्या पोळ, विनया खडपेकर, मंगला आठलेकर, मृणालिनी चितळे, वंदना बोकील अशी अनेक वलयांकित नावे आहेत. ही यादी आणखीही मोठी आहे आणि त्याचा आम्हाला अभिमानच वाटतो. एकूणच राजहंसची स्त्री-विषयक पुस्तकांची संख्या पुष्कळ

आहे. सर्वच पुस्तकांचा, लेखिकांचा उल्लेख प्रस्तुत अंकात शक्य नाही; मात्र या अंकातील जाहिरातींमधून, लेखांमधून, अन्य मजकुरांतून स्त्री-विषयक वेगवेगळी पुस्तके, स्त्रियांचे लेखन वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्री-जीवनाच्या विविध बाजूंचे दर्शन घडवणारे राजहंसी पुस्तकसृष्टी आपणांस निश्चित आवडेल असा विश्वास वाटतो. या निर्मितीत तुम्हा वाचकांचे योगदानही तितकेच मोलाचे आहे.

यंदाच्या राज्य वाङ्मय पुरस्कारप्राप्त तसेच अन्य साहित्य पुरस्कारप्राप्त साहित्यिकांचे राजहंस परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

हिंदू नववर्षाचे स्वागत करण्यासाठी सृष्टी तर सजली आहेच; आपणही स्वागतोत्सुक होऊ या. सृष्टीचा पाडवा अंतरंगात उतरवून दृष्टीचा पाडवा साजरा करू या. त्यासाठी राजहंस परिवाराकडून आपल्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**डॉ. प्रिया निघोजकर**
कार्यकारी संपादक


'राजहंस ग्रंथवेध' या नियतकालिकाची मालकी व इतर तपशिलासंबंधीचे निवेदन
फॉर्म नं. ४ (नियम ८ अन्वये)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०. |
| २. | प्रकाशन काळ | : मासिक |
| ३. | मालक, प्रकाशक | : सौ. रेखा दिलीप माजगावकर |
| | नागरिकत्व | : भारतीय |
| | पत्ता | : वरीलप्रमाणे |
| ४. | मुद्रक | : रिच प्रिंट्स |
| | नागरिकत्व | : भारतीय |
| | पत्ता | : २७२ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०. |
| ५. | संपादकाचे नाव | : डॉ. सदानंद बोरसे |
| | पत्ता | : बोरसे नर्सिंग होम, उजवी भुसारी कॉलनी, पौड रस्ता, कोथरूड, पुणे ४११ ०३८. |

मी, रेखा दिलीप माजगावकर असे जाहीर करते की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

***रेखा दिलीप माजगावकर***
दि. १५ मार्च २०२५ प्रकाशक

# मेंदूतला माणूस

*मेंदूच्या काम करण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीमुळे माणसाच्या वागण्या-बोलण्याच्या संदर्भातील काही धागेदोरे हाती लागतात का हे पाहण्याचा उत्कृष्ट प्रयत्न म्हणजे हे पुस्तक - मेंदूतला माणूस.*

डॉ. आनंद जोशी आणि सुबोध जावडेकर लिखित मेंदूतला माणूस हे पुस्तक वाचनात आलं. टीव्हीवर रामानंद सागर यांचं संपूर्ण रामायण पाहताना जशी आपल्या मनानं पकड घेतली होती तशीच पकड हे पुस्तक वाचताना आपलं मन घेतं. रामायण पाहताना दुसऱ्या दिवसाची उत्कंठा जशी लागून राहते, तशीच उत्कंठा या पुस्तकाच्या पुढील भागाचं वाचन करण्यासाठी लागून राहते.

मेंदूची कार्यपद्धती खूपच गुंतागुंतीची असते. मेंदूचं काम नक्की कसं चालतं हे विज्ञानालाही माहीत नव्हतं. माणसाचा मेंदू हा प्रगत ठरला तो त्याच्या मेंदूमध्ये वरचेवर होणाऱ्या उत्क्रांतीमुळे! माणसाच्या मनात चांगले-वाईट विचार येतात, माणुसकी, सहानुभूती, आदरयुक्त भाव, प्रेम, स्वभाव, आकाश अशा नानाविध संज्ञा मेंदूमधील पेशींच्या विशिष्ट जुळणीतून निर्माण होतात आणि याचंच आश्चर्य वाटतं. माणसाला पडलेलं सर्वांत मोठं कोडं म्हणजे त्याचा मेंदू! मेंदूच्या अभ्यासातून अनेक आश्चर्यकारक बाबींचा उलगडा जेव्हा होईल, तेव्हा माणसाच्या जीवनावर अधिक चांगला प्रभाव पडू शकेल. माणसाच्या आजारपणात तंत्रज्ञानासोबत संगीताची जोड देण्यास वैद्यक शास्त्रानं सुरुवात केल्याची अनेक उदाहरणं आपण पाहतो आणि या उपचारांची यशस्वी सांगतादेखील झाल्याचं आपल्या दृष्टीस पडतं.

पुस्तक वाचताना मनाचा थांगपत्ता लागत नसला, तरी विचारांचा उलगडा होतो. माणसामाणसांत थोडं जरी खटकलं तरी राग अनावर होतो, कधी कधी सुडाचा अंगार पेटतो. माणसाच्या मनात अशा वेगवेगळ्या भावना कशा निर्माण होतात याचा नव्यानं शोध घेण्याचा प्रयत्न चालू आहे. यात जसा प्रगतीचा मार्ग विकसित होत जाईल, तसा माणसाचा मेंदू अधिक प्रगल्भ होत जाईल.

मेंदूतील पेशींच्या विशिष्ट जुळणीतून निर्माण होणाऱ्या संज्ञांमुळेच मानवाला प्रगतीची अनेक कवाडं खुली झाली आहेत. नियतीनं दिलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण देणगीमुळे

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




पाकिस्तानचा इतिहास, संस्कृती, राज्यव्यवस्था, राजकारण, अर्थव्यवस्था, सामाजिक बांधणी आदींचा घेतलेला वेध; तसंच स्वतंत्र, सार्वभौम आणि एकसंघ राष्ट्र म्हणून पाकिस्तानचं भवितव्य काय असेल याविषयी केलेलं साक्षेपी विवेचन.

### पाकिस्तान का मतलब क्या?

श्रीधर लोणी

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

डॉक्टर-पेशंट नात्यात विसंवाद निर्माण होण्यास कारणीभूत ठरते वैद्यकीय व्यवसायातील चुरस! वैद्यकीय प्रवेशांतील गोंधळ, याविरुद्धचा लढा, प्रशासन-विद्यार्थी-पालक आणि माध्यमे यांनी एकमेकांवर व न्याययंत्रणेवर टाकलेले डावपेच या साऱ्यांचा, प्रत्यक्ष सहभागी झालेल्या तज्ज्ञाने घेतलेला वृत्तान्तवेध म्हणजे हे पुस्तक -

### शह आणि काटशह
वैद्यकीय व्यवसायातील चुरस

डॉ. राजीव जोशी

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)







स. ह. देशपांडे यांनी अर्थकारण, समाजकारण, राष्ट्रवाद आणि ललितवाङ्मय या सर्व क्षेत्रांत पाच दशकांहून अधिक काळ मुशाफिरी करून वाचकांसमोर ठेवलेला अनुभवसमृद्ध विचारांचा ऐवज...

### ऐवज विचारांचा
निवडक लेखसंग्रह

स. ह. देशपांडे

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

कलाकौशल्य, खेळणं, बागडणं इत्यादींचा विकास माणसाला घडवून आणता आला; एवढं मेंदूचं कार्य अफाट आहे. एकच गोष्ट आपण जेव्हा करतो तेव्हा अनेक विचारांची घालमेल मनात चालू असते याची आपल्याला कल्पनाही येत नाही. मेंदूच्या रचनेबद्दलचं कुतूहल सर्वांनाच आहे, त्याविषयी जाणून घेण्यासाठी हे पुस्तक वाचणं आवश्यक आहे. मेंदूतील पेशींची कार्यपद्धती एवढी अफाट आहे की कल्पनेच्याही पलीकडील आहे. एकदा एकांतात बसलो असताना अचानक मेंदूतील पेशी कार्यरत झाल्या आणि पुण्यात मुलाच्या घरी पाहिलेल्या 'कांचन मेहंदी' या फलकावरून अचानक गाण्याची आठवण झाली. 'होगा तुमसे प्यारा कौन, हे... कांचन!' इतक्यात लगेच दुसऱ्याही गाण्याची आठवण आली ती म्हणजे... 'कांची रे कांची रे प्रीत मेरी सांची, रुक जा न जा तू दिल तोड के'. गेली अनेक वर्षं न ऐकलेल्या या गाण्याची आज आठवण कशी झाली पहा! मेंदूतील पेशी कशा कार्यरत असतात याचं उत्तम उदाहरण म्हणून इथे उल्लेख करत आहे. हे पुस्तक माणसातल्या मेंदूवर नसून मेंदूतल्या माणसावर आहे याची जाणीव पुस्तक वाचताना पदोपदी होते. माणसं अनेकदा विचित्र, अनाकलनीय, चक्रमपणे का वागतात यामागील कार्यकारणभाव जाणून घेण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे हे पुस्तक, मेंदूतला माणूस!

आपल्याला चिडचिड होते आणि संतापाचा उद्रेक मनात निर्माण होतो, याचा अर्थ प्राण्याच्या मेंदूतील काही अंश आपल्याही मेंदूत आला आहे हे जाणवतं आणि आपल्या वागणुकीतही तसं दिसून येतं. सगळ्याच बाबी नियंत्रित करता येणं शक्य नसलं; तरी ज्या मेंदूमध्ये या बाबी निर्माण होतात, त्याच्याबद्दल थोडी जरी जाणीव आपल्या मनात निर्माण झाली, तर त्या बाबी आपल्याला आटोक्यात आणता येतील असा विश्वास हे पुस्तक वाचताना निश्चित येतो. याचसाठी तर 'मेंदूतला माणूस' या पुस्तकाचं वाचन, चिंतन आणि मनन करण्याचं मोठं धाडस करू या!

***राजन मनोहर बुटाला***, डोंबिवली


माणसाच्या साऱ्या भावना मेंदूत उपजतात. मेंदू म्हणजे बुद्धी आणि प्रज्ञाच नाही, तर कलाकौशल्य नि क्रीडानैपुण्यसुद्धा! जाणिवेचा प्रकाश, नेणिवेचा अंधार या मेंदूच्या गाभाऱ्यात एकत्र नांदतात. माणूस म्हणजे मेंदूच... याच मेंदूचा शोध म्हणजेच माणसाचा शोध घेणारे...




मेंदूतला माणूस

डॉ. आनंद जोशी । सुबोध जावडेकर

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

अभिनंदन!

## राज्य वाङ्मय पुरस्कार, २०२३



प्रौढ वाङ्मय : पर्यावरण विभाग
डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार

**सह्याचला आणि मी :**
**एक प्रेमकहाणी**

◆

माधव गाडगीळ



अभिनंदन!

## राज्य वाङ्मय पुरस्कार, २०२३



प्रौढ वाङ्मय : संकीर्ण
भाई माधवराव बागल पुरस्कार

**काश्मिरियत**

◆

सुप्रिया राज




अभिनंदन!

## महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे



कै. द. वा. पोतदार
स्मृती पुरस्कार

**हिंदुत्व, मार्क्सवाद**
**आणि भारत**

◆

विजय आपटे



## इंदिरा

*१९७१ साली 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्राप्त करणाऱ्या, तसेच हा सन्मान मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय महिला म्हणजे इंदिरा गांधी होत. पुपुल जयकर लिखित व अशोक जैन अनुवादित 'इंदिरा गांधी' हे पुस्तक 'राजहंस'ने प्रकाशित केले आहे. त्यातील 'त्राटक आणि ध्यानधारणा' या प्रकरणातील हा संपादित अंश.*

१९६६ साली पहिल्यांदा पंतप्रधान बनल्यापासून महत्त्वाचं भाषण तयार करण्याची तिची पद्धती बदलली नव्हती. आपलं मन शक्य तितकं विस्तारायचं, अंतरंगातून ताज्या प्रवाहांचा शोध घ्यायचा; अशी तिची पद्धत होती. मित्र, सल्लागार, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, कलाकार यांच्याशी ती विचारविनिमय करी, माहिती घेई, योग्य उतारे, उद्धरणं शोधी.

एकदा दुपारी तिनं मला बोलावलं होतं. पलंगावर बसून ती भाषणाचा मसुदा तयार करत होती. तिच्या भोवती टिपणं, कच्चे मसुदे, चिठ्ठ्या, पुस्तकं, शब्दकोश, कात्री, टाचण्या असा सारा पसारा पडला होता. ती परिच्छेद कापून, ते नीट जुळवून पहिला मसुदा बनवत होती. तिनं तो टाइप करायला पाठवून दिला. तो टाइप होऊन आला, पण टायपिंग निष्काळजीपणे केलेलं होतं आणि कागदही भिकार वापरलेला होता. महात्मा गांधींनी तिला लहानपणी कागदाचा काटकसरीनं वापर करायला शिकवलं होतं. त्यामुळे ती कागद वाया घालवत नसे. इंदिरेनं तयार केलेला मसुदा वाचून दाखवला. इतर अनेक मित्रांप्रमाणे मीही काही कल्पना सुचवल्या होत्या, परिच्छेद लिहून पाठवले होते. ती कुठून तरी एखादा वाक्प्रयोग, दुसरीकडून एखादा परिच्छेद घेत होती, अचूक शब्दासाठी शब्दकोश धुंडाळीत होती. जवाहरलाल नेहरू, रवींद्रनाथ टागोर यांच्या लिखाणातील किंवा उपनिषदातील एखादं उद्धरण शोधून काढीत होती. भाषणाचा मसुदा परत परत बनवत होती. अचूक शब्द, वाक्प्रयोग यांनी गहिरा परिणाम साधावा म्हणून आटोकाट प्रयत्न करीत होती. भाषणाचा अंतिम

मसुदा, परिच्छेदांची मांडणी तिची स्वत:ची असे. भाषण देण्याच्या आदल्या दिवशी रात्री उशिरापर्यंत ती ते तयार करीत बसे.

पॅरिसला जाण्यापूर्वी तिनं अध्यक्ष मित्तरां यांच्या आठवणींचे फ्रेंच भाषेतील खंड वाचून काढले. उभयतांना साहित्य आणि निसर्ग यांत असलेला रस व परिपक्व दृष्टिकोन यांमुळे दोघा नेत्यांत सहज संवाद निर्माण होऊ शकला. सॉर्बन विद्यापीठात लेखक, तत्त्वज्ञ व अध्यापक यांच्यापुढे इंदिरेनं फ्रेंचमधून भाषण केलं. त्यांच्याशी एकदम आपुलकीचा दुवा निर्माण केला. भाषण व्यापक होतं, अनेक विषयांचा त्यात समावेश होता. प्राचीन काळात भारतीयांनी ज्ञानाची विविध क्षेत्रं धुंडाळली, वादविवाद हा त्यांच्या चौकसपणाचा पाया होता. अंतर्गत, धार्मिक विश्व जतन करताना बाह्य भौतिक विश्वही त्यांनी सांभाळून ठेवलं, असं ती म्हणाली. पूर्व व पश्चिमेच्या पारंपरिक कल्पना आता कालबाह्य बनल्या आहेत, हे पाश्चिमात्यांनी ओळखावं, असं आवाहन तिनं केलं. पाश्चात्त्य राष्ट्रांतील तरुण आध्यात्मिक प्रकाशासाठी पौर्वात्य राष्ट्रांकडे पाहतो, तर भारतातील तरुण पाश्चात्त्य राष्ट्रांची श्रीमंती, वैभव व वैज्ञानिक ज्ञान यानं दिपून जातो. आपल्या मूळ वारशाचा विसर पडू न देता, एक नवा जागतिक नागरिक निर्माण होण्याची आवश्यकता तिनं प्रतिपादन केली.

तिच्या सॉर्बन विद्यापीठातील त्या भाषणाचं चांगलं स्वागत झालं होतं. सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रांतील तज्ज्ञांनी त्या भाषणाबद्दल तिची स्तुती केली होती. फ्रान्सच्या सांस्कृतिक बाबींमध्ये तिला खूप रस होता. आम्ही त्याबद्दल, फ्रेंच लोक व तेथील काही व्यक्ती यांबद्दल गप्पा मारल्या.

अध्यक्ष मित्तरां यांनी शिष्टाचाराच्या सर्व प्रथा मोडल्या आणि ते इंदिरेला निरोप देण्यासाठी स्वत: विमानतळावर हजर राहिले. इंदिरेविषयीचा स्नेहभाव व तिच्याबद्दलचं कौतुकच त्यांच्या या कृतीतून प्रकट होत होतं. भारताच्या निमंत्रणाला मान देऊन





स्वयंभू, कठोर, खंबीर, प्रसंगी वादळ उठवणारी नि
झेलणारी इंदिरा पुढे हळवी, परावलंबी, अंधश्रद्धाळू बनली.
तिच्या मनातील आंदोलनाचा, स्वप्नांच्या उदयास्ताचा,
तिच्या कोंडलेल्या श्वासाचा, खाजगी जीवनातील
अज्ञात घटनांचा भारावून टाकणारा प्रवास.

**इंदिरा गांधी**

पुपुल जयकर । अनुवाद : अशोक जैन

आवृत्ती विसावी । किंमत : ₹ ६५०/- । (ट.ख. ₹ ५०)

१९८२च्या हिवाळ्यात मित्तरां भारतभेटीस आले आणि त्यामुळे ही मैत्री अधिकच दृढ झाली. मानवजातीच्या भवितव्यासाठी दोघांनी मिळून कार्य केलं.

जेव्हा उदास भावना मनाला घेरून टाकीत, तेव्हा स्पष्ट दिशेचा शोध घेण्याची तिच्या मनाला सवय होती. त्या दिवशी संध्याकाळी तिला वेळ होता. आम्ही दोघी काही वेळ नि:स्तब्ध बसून होतो. अचानक माझ्याकडे वळून ती म्हणाली, ''आत्मज्ञानाबद्दल आपण बोलू या का? स्वत:चाच शोध घ्यायचा कसा?'' गेल्या अनेक वर्षांत कित्येकदा तरी तिनं मला हा प्रश्न विचारला होता, पण दर वेळेला ती जणू नव्यानं सुरुवात करीत असे! संभाषणाच्या आरंभी तिच्या मनात उठलेलं भावनांचं वादळ हळूहळू थंडावू लागे. मी म्हटलं, ''आत्मज्ञानात प्रत्यक्ष काय आहे याचं ज्ञान होणं आवश्यक असतं. राग, मत्सर, संशय, भीती या भावना तुझ्या मनातून प्रवास करत असताना, त्यांच्याशी संघर्ष करताना, त्या दाबून न ठेवता अथवा त्या बदलण्याचा प्रयत्न न करता, तुला पाहता येणं शक्य आहे काय? मनातला जो काही कोलाहल आहे त्याच्या 'निकट' जाणं तुला जमेल का? आपल्या मनातील विचारांचं समर्थन वा निषेध न करता ते ऐकणं आणि बाह्य जगतातील कृतीही ऐकणं तुला शक्य आहे का?'' मनाच्या अशा अवस्थेत चित्त एकाग्र होऊ शकतं आणि ते शोध घेत राहतं, हाताला नवीन काही तरी लागू शकतं. तिला नेमकं काय समजलं आहे हे ताडणं कठीण असलं, तरी ती लक्षपूर्वक ऐकत होती. माझं बोलणं संपल्यावर ती म्हणाली, ''माझ्या दृष्टिकोनात विचारांची भूमिका फार कमी असते. मला जाणवत असतं, अगदी माझ्या त्वचेच्या रंध्रारंध्रांतून मला जाणवत असतं. ही धरती, हा निसर्ग, छोटी मुलं आणि भारताची जनता मला पार विरघळवून टाकत असते.''

''मी धार्मिक वाटते का?'' असं तिनं मलाच विचारलं. ''पेचप्रसंगाच्या वेळी शांत राहणं, आत्मज्ञानाचा शोध घ्यावासा वाटणं, याचा अर्थ तुझ्यात एक प्रभावी धार्मिक भावना आहे असा होतो.'' एवढंच मी म्हटलं.




रोजच्या ताण-तणावाच्या व प्रचंड कामाच्या रगाड्यातही पंतप्रधानाला ध्यानधारणा, आत्मज्ञान, चक्र व त्राटक अशा गोष्टींची चर्चा करायला वेळ सापडावा, याचं मला आश्चर्य वाटायचं.

कलाप्रदर्शनांना भेटी देणं तिनं सुरू केलं. पुस्तकं, संगीत, चित्रपट यांत तिला असलेलं स्वारस्य अजून टिकून होतं. लेखक, कलाकार यांची संगत तिला आवडे. कुशल कारागीर, मिथिला येथील महिला चित्रकार यांना

भेटण्यात तिला नेहमीच आनंद होई. त्या महिनाभरात देशाच्या घडामोडींपासून काहीसं अलिप्त राहून तिनं सर्जनशील प्रतिभावंतांच्या समवेत वेळ घालवल्यानं तिला टवटवी आली. राजकीय व घरगुती तणावापासून तिचं मन मोकळं झालं. लंडन इथं भारत महोत्सवाचं उद्घाटन करण्यासाठी ती जाणार होती. त्यासाठी ती उत्सुक झाली होती.

❖

अभिनंदन!

राजहंस प्रकाशनाने अनुवादित केलेल्या
**नंदीघोष-यात्रा**
**श्रीकृष्णकथा : वेध नवा**
या पुस्तकाच्या,
सतीश मुटाटकर व यशवंत मराठे लिखित
मूळ साहित्यकृतीस सन्मानाचा
'गोल्डन बुक' पुरस्कार प्राप्त.




अभिनंदन!

श्री कोट्टला बसवेश्वर भारतीय शिक्षण समिती,
भारत विकास संगम व विकास अकादमी



भारत गौरव
पुरस्कार

**विश्वसंवाद**

◆

मन्दार कुलकर्णी



*हजारो वर्षांच्या परंपरेचे पाथेय आपल्या अक्षरवाङ्मयातून पुढील पिढ्यांना देणारी,*
*संस्कारशील असूनही आपले स्वयंभूपण आणि मूलकंद जपणारी*
*आपली मातृभाषा मराठी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर या वर्षी घटस्थापनेच्या मुहूर्तावर*
*अभिजात भाषांच्या पंक्तीत विराजमान झाली आहे. मायमराठीच्या समृद्ध ठेव्यातील*
*भाषेची सौंदर्यस्थळे व सामर्थ्यस्थळे अंशरूपाने वाचकांसमोर ठेवणारे हे सदर.*
*अखेर 'पिंडी ते ब्रह्मांडी...'*

वसंतागमन झाले आहे. सृष्टीचा हा बहराचा काळ अनेक प्रतिभावंतांसाठी सर्जनाचा सोहळा झालेला आहे. आपल्या मराठी साहित्यसृष्टीतील त्यांपैकीच काही उदाहरणे येथे दिली आहेत. संत ज्ञानेश्वर म्हणतात... देहबुद्धीची रूक्ष पाने गळून गेल्यावर वैराग्यवसंताच्या आगमनाने फुटणाऱ्या नवनवोन्मेषाच्या आल्हाददायी पालवीतून बहरणारा सोहम् भावाचा मोहोर हाच अभ्यासयोगाचा आरंभ आहे. या सोहम् भावाच्या मोहरातून रुचिरफल प्राप्त होण्यास वेळ लागत नाही.

*एऱ्हवीं दिवस तरी अपुरे । परी वैराग्यवसंताचेनि भरें ।*
*जे सोहम् भाव महुरें । मोडोनि आला ॥* ६.१४९
*म्हणौनि प्राप्तिफळीं फळतां । यासि वेळु न लगेल आतां ॥* ६.१५०

एक चिरंतन सत्य अशा काव्यमय भाषेत माउली आपल्याला सांगतात. विरक्ती म्हणजे रूक्षता असा समज आहे. पण येथे तर संत ज्ञानेश्वर वैराग्याला वसंत ऋतूची उपमा देतात. सर्व जुनाट पानांची रूक्ष अडगळ झटकून चित्तवेलीला नवनवोन्मेषाच्या आल्हाददायी पल्लवीने टवटवीत करणारा तो वसंत ऋतू असे ते म्हणतात.

## वसंतहृदय चैत्र

फाल्गुन, चैत्र आणि वैशाख हे तीन महिने वसंताच्या पुष्पमुद्रेचे चिन्ह ल्यालेले, बेसुमार रंगांनी नटलेले, प्रखर उन्हाने अंग भाजणारे, पण त्याच वेळी अत्यंत शीतल सुखकारक अशा दक्षिणानिलांनी गात्रांना सुखविणारे, दृष्टीला भ्रांत करणारे, प्राणीमात्रातल्या निर्मितीच्या शक्तीच्या उन्मादक वृत्तींना चेतविणारे असे हे महिने

## ‘स्त्री’संवेदनेला ‘राजहंसी’ कोंदण




आयुष्यात भेटलेली माणसं आणि त्याबरोबरच
झाडं, फुलं, पानं, रानं, पक्षी... एवढंच नव्हे;
तर गाणी, घरं आणि रस्ते यांच्या अम्लान,
नितळ व्यक्तिचित्रांनी आणि निसर्गचित्रांनी
सजलेलं एक नितांतसुंदर दालन.

### शोध आरस्पानी

डॉ. शुभदा खिरवडकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

शिष्य, मैफलगायक, संगीतकार आणि गुरू
ही त्यांची संगीतविश्वातील चार रूपं.
यात अव्वल असण्याची त्यांची आंतरिक ऊर्मी!
यातून खूप काही घडत गेलं. या प्रवासाचा वेध

### अभिषेकी

पं. जितेंद्र अभिषेकी : कला आणि जीवनप्रवास

शैला मुकुंद

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)







आजच्या सामाजिक-राजकीय-आर्थिक परिस्थितीशी
नानाविध ज्ञानशाखांच्या एकात्मिक अभ्यासाचा
संबंध जोडत माणसाच्या व्यक्तिगत
अन् सामूहिक वर्तनाचा वैज्ञानिक वेध घेणारे...

### माणूस ‘असा’ का वागतो?

अंजली चिपलकट्टी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

आहेत. एक दुसऱ्यात मिसळला आहे. तरीपण चैत्र हा खरा वसंतात्मा आहे, मधुमास आहे, ऋतुराज वसंताचे स्पंदन पावणारे हृदय आहे यात शंका नाही. चैत्र हा कुसुमाकर आहे. 'पुष्पधळीमाजी लोळे वसंत' असे मुक्तेश्वरांनी म्हटले आहे. याच महिन्यात परागांवर वसंत खरोखर लोळत असतो. ऋतुराजाचे किंवा मधुमासाचे लक्षण ज्ञानेश्वरांनी सुंदर रितीने वर्णन केले आहे :

*जैसे ऋतुपतीचे द्वार । वनश्री निरंतर ।*
*वोळगे फळभार । लावण्येसी ।।*

ऋतुपतीच्या द्वारी वनश्रीचे म्हणजे नवपल्लवांनी गर्द झाकलेल्या फुलांनी डवरून गेलेल्या वृक्षलतांचे दर्शन. हे दर्शन तर फाल्गुनातच घडते. मग मधुमासाचे वैशिष्ट्य कशात आहे? या महिन्यात ते सारे सौंदर्य तर आहेच पण फळांचेही रूप दृष्ट लागेलसे असते. फुलांतून, फळांतून मधुरस वाहत असतो. माधुर्याची प्रतीती मनामनाला होत असते. पानाफुलांची शोभा उत्कटतेने प्रकट होत असते. पक्ष्यांचे पर्युत्सुक कंठ स्वच्छंद गाणी गात असतात. संयमाची बतावणी निसर्ग झुगारून देतो. उन्मत्त प्रेमाची उकळी जीवजंतूंच्याही अंगातून फुटते. 'कुणास्तव कुणीतरी' या वेळी काहीतरी करण्याच्या खटपटीत असते. नटूनथटून दुसऱ्याला आकर्षित करायचे आणि परस्परांच्या सहकारातून स्वत:चे चिमुकले शूद्र जीवनही विश्वाच्या भव्य नियतीत एकरूप, एकतान होईल असा आनंद निर्माण करण्याचे प्रकृतीचे तंत्र सारी सजीव सृष्टी या वेळी पाहा कशी मुक्तहस्ताने वापरीत आहे.

चैत्रातल्या पर्णशोभेचे आणि फळशोभेचे वर्णन आंब्या-फणसाशिवाय पूर्ण होणार नाही. वसंताशी पावसाअखेरीपासूनच मोहरून सहकार करणारे हे आंब्याचे झाड लांबलचक देठांना लागलेले कैऱ्यांचे हिरवे गोळे वाऱ्याबरोबर झोके घेत असतात. पोपट किंवा कावळे त्या पाडाला लागल्या आहेत की नाही ते पाहण्याकरिता त्यांना चोचींनी प्रहार करतात. तेव्हा मोठी मौज दिसते. गावाबाहेरच्या झाडांतून कोकीळकूजनही बहुधा याच झाडांवर चालत असते. कैऱ्या जून झालेल्या असतानाच एकीकडे पाने झडत असतात. पण झाड रूक्ष असे कधीच दिसत नाही. चैत्रात याही झाडाला पालवीचे घोसच्या घोस लागतात आणि कैऱ्यांवर तेही झोके घेतात. माघातले मोहोरांच्या झुबक्यांनी भरलेले व सुगंधाने दरवळलेले झाड सुंदर की आताचे, हे सांगणे कठीण आहे. आणि फणस? त्याला नजरेत भरण्यासारखी पालवी नसली तरी तेही टवटवीत दिसते आहे. त्याची फळे पायापासून डोकीपर्यंत लदली गेलेली नजरेत भरताहेत. फणसाला फुले धरत नाहीत, पण पौष - माघात त्याला हिरवे कोके येतात. फुगीर मिरचीसारखे. मग एकेक कोका दुभंगतो. वरचे टरफल तपकिरी होऊन गळते. आतला हिरवा फणस गुळगुळीत तुकतुकीत असतो. मग काही दिवसांनी त्यावर खसखशीसारखे बारके दाणे दिसू लागतात. ते दाणे वाढून पांढऱ्या किडीसारखे तंतू बनतात. त्यांच्या खालून काटे वाढतात. आणि ते तंतू गळले की संपूर्ण अवयवांनी

## ‘स्त्री’संवेदनेला ‘राजहंसी’ कोंदण



कविकुलगुरू कालिदासाचे ‘मेघदूत’ हे खंडकाव्य म्हणजे अभिजात गीर्वाणभाषेचा एक अनुपम अलंकार! कालिदासाच्या ‘मेघदूता’चा जणू ‘सीक्वेल’ म्हणजे या दूताच्या प्रवासाचे वर्णन करणारे...

### मी सखा मेघदूत

हर्षदा पंडित

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची, भौगोलिक तसेच मानसिकही. हेतू, साधने आणि साध्य काहीही असो, आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

### आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)





ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची. ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी अपघातानं ती एक चूक करते. पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं. यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का? परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

युक्त पण आकाराने मुसुंब्याएवढा फणस तयार होतो. अगदी बुंध्यापासून ते धरतात. कधीकधी फळ अर्धे मातीतपण गाडले जाते.

रूपरसगंधमय अशा या चैत्रमासाची शोभा झाडावरच्या काही बांधल्या जाणाऱ्या आणि काही बांधल्या गेलेल्या पक्ष्यांच्या घरट्याने पूर्णत्वाला येते. ठिकठिकाणी काही लोंबत्या आकारांची तर काही वाटोळी चेंडूसारखी तर काही पसरट गोल, अशी ही काळीकबरी घरटी म्हणजे वसंताच्या चित्रलिपीतली सुंदर विरामचिन्हे वाटतात मला. समोर सारी झाडे पालवताहेत, फुलताहेत, फळताहेत; पक्षी गाताहेत, मिलन पावताहेत; घरे बांधून अंडी घालताहेत, सारा सारा निसर्गाविष्कार उघड्यावर पडला असून त्याच्या त्या विराट खुलेपणामुळेच त्याच्याभोवती गूढ आवरण पडल्यासारखे वाटते आहे. उघड्या दोन डोळ्यांत तो आविष्कार मावत नाही. बुद्धीचे चिमुकले विश्व या पसाऱ्याचे प्रतिबिंब साठविण्यास असमर्थ असते. या पसाऱ्यातलाच एक सचेतन सुखलोलुप परिमाणू म्हणजे आपले मन, आपले शरीर, आपल्या साऱ्या संवेदना असे मात्र सारखे जाणवत असते.

*(दुर्गा भागवत, ‘ऋतुचक्र’, ‘मौज प्रकाशन’मधून साभार)*

---

## *हेही आवश्यक असते*

मी पंचांगाला चैत्र कधी हे विचारलेच नाही;
झाडांची पोपटी पालवी मला अधिक विश्वासार्ह वाटली.
सर्वसाक्षी आकाशालाच विचारावेत असे प्रश्न
ग्रहताऱ्यांना विचारू नयेत, पाखरांचे पाखरांना;
त्यापूर्वी, वाचलेले सर्व फेकून द्यावे; स्वत:साठी हेही आवश्यक असते.

*(द. भा. धामणस्कर, प्राक्तनाचे संदर्भ, मौज प्रकाशनमधून साभार)*

❖

निसर्गसहवासाची आवड. कुंवार जंगलाचे अननुभूत सुख व अरण्यवासींचे निसर्गजीवन जवळून पाहताना मनभर झालेली रानमोहिनी. यातून उमललेल्या भावफुलांमधून श्वासाश्वासात सामावलेला काव्यगंध.

**रानगंध**

मीनल प्रधान

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘स्त्री’संवेदनेला ‘राजहंसी’ कोंदण




नव्याने रुजू झालेला तरुण, तडफदार इन्स्पेक्टर धनेश...
गावातील प्राचीन शिवमंदिर नि त्याविषयीच्या आख्यायिका...
एकामागोमाग एक घडणाऱ्या रहस्यमय घटना...
धनेश त्याच्या गुप्त ‘मिशन’मध्ये यशस्वी होणार का?

### द सीक्रेट मिशन

राधिका कुलकर्णी

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)

ज्ञानाची क्षितिजे, नीतिमत्तेच्या चौकटी, वैद्यकसत्ता
अन् मानवी प्रवृत्ती या साऱ्यांचा वेध घेणारी
अमर्त्य पेशींची खरीखुरी कहाणी...

### ‘हेला’पेशी

कहाणी अमर्त्य पेशीची

वंदना अत्रे । शोभना भिडे

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)







१८५७-१९५० या काळाच्या पार्श्वभूमीवर
आजवर अपरिचित असलेल्या पाच स्त्री चित्रकार!
अँजेला त्रिंदाद, अंबिका धुरंधर, विमल गोडबोले,
मारी हेंडरसन, मग्दा नाख्मन यांच्या कौटुंबिक
जीवनाचा आणि कर्तृत्वाचा शोध आणि बोध!

‘बॉंबे स्कूल’ कला परंपरेतील
### स्त्री चित्रकार (१८५७-१९५०)

साधना बहुळकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक

## बाय गं...

*स्त्रियांचे सक्षमीकरण म्हणजे पुरुषांसोबतचा संघर्ष नव्हे किंवा त्यांच्यासोबत चालू असलेली बरोबरीची स्पर्धाही असू शकत नाही हा विचार मांडत, स्त्रीजीवनाच्या मागील तीन पिढ्यांचा, तिच्या जीवनातील बदलांचा प्रदीर्घ पट म्हणजे 'बाय गं' ही कादंबरी होय.*

आतापर्यंत स्त्रीविषयक लेखन पुष्कळच झाले आहे. ताराबाई शिंदेंच्या 'स्त्री-पुरुष तुलना'पासून सुरू झालेला हा प्रवास हल्लीच्या अनेक कादंबऱ्यांमधे 'सक्षम स्त्री' चितारण्यापर्यंत बराच व्यापक आणि प्रदीर्घ चर्चा-चर्वणांचादेखील आहे. आताशा स्त्री सक्षम झालीच आहे, असा सार्वत्रिक समज झालेला असताना पुन्हा स्त्रीवादी लेखनाचे प्रयोजन काय? असा प्रश्न मला बऱ्याच वेळा विचारला गेला. म्हणजे आता 'झाले की पुरे कौतुक स्त्रीवादाचे किंवा सक्षमीकरणाचे' असे काहीसे! त्यामुळे स्वाभाविकपणे अनेकांना त्यात नवीन काही सांगण्यासारखे राहिले नाही असेही वाटते. पण मला प्रांजळपणे यात खूप काम होण्याची अद्याप गरज आहे, असे वाटले. याबाबतीत अनेक घटना पडताळताना 'अजून उजाडत नाही गं' ही भावना पुन:पुन्हा मनावर उमटत राहिली आणि तीव्रतेने टोचत राहिली. आजवर झालेल्या बहुतांश लेखनात एखाद्या स्त्रीची कथा, व्यथा, संघर्ष मांडण्यात आला आहे;परंतु स्त्रीचा समग्र समूह किंवा समाज म्हणून विचार झालेला नाही. त्या दृष्टिकोनातून पाहता तिच्या सामाजिक जीवनाचा चलतपट म्हणजे 'बाय गं' असे म्हणता येईल. स्त्रियांच्या उत्थानाच्या बाबतीत वैयक्तिक क्रांतीपेक्षा सामाजिक उत्क्रांती अधिक महत्त्वाची आहे, हा विचार प्रथमत: माझ्या मनात 'पानिपत' वाचल्यानंतर आला. 'एक लाख बांगडी फुटली' हे वाक्य वाचताना पहिला प्रश्न




किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

पडला तो म्हणजे या एक लाख फुटलेल्या बांगड्यांचे समाजातील स्थान काय असेल? त्या बायांना समाजाने कसे वागवले असेल किंवा व्यवस्थेत कसे जिरवले असेल? त्यांचे जगणे नेमके कसे असेल किंवा कुठल्याही काळातील सामान्य स्त्रियांचे दैनंदिन जगणे नेमके कसे असेल? याबद्दल कोणालाच काही सांगावेसे का वाटले नाही, त्यांच्याबद्दल काहीही विचार व्हावा इतक्या महत्त्वाच्या नव्हत्याच का त्या? इथून स्त्रीच्या सामाजिक स्थानाविषयी, महत्त्वाविषयी शोधमोहीम सुरू झाली आणि लक्षात आले की, कुठल्याच काळातील वाङ्मयात ते महत्त्वाचे नाही...

पिढ्यान्‌पिढ्या बाई जन्माला येते. कुटुंबाशी, समाजाशी असलेली तिची सर्व नाती कसोशीने निभावते. समाजाच्या जडणघडणीतील आपली भूमिका इमानेइतबारे पार पाडते आणि विरून जाते, तिचे हे असे विरून जाणे समाजाच्या गावीही नसते, कारण समाजामध्ये काहीतरी महत्त्वपूर्ण बदल घडवणारी क्रांतिकारी घटना ना तिच्या जन्माने घडते ना मरणाने. आवर्जून दखल घेतली जावी असे तिच्या जगण्यात काहीच नसते का? याचे उत्तर शोधण्याचा एक बारीकसा प्रयत्न म्हणजे 'बाय गं'. या निमित्ताने तथाकथित सक्षमीकरणाचा आढावादेखील घेता आला. स्त्रियांचे सक्षमीकरण म्हणजे पुरुषांसोबतचा संघर्ष नव्हे किंवा त्यांच्यासोबत चालू असलेली बरोबरीची स्पर्धाही असू शकत नाही, हा विचारही पेरता आला.

इंग्रजांनी देऊ केले तसे 'वसाहतीचे स्वराज्य' समाजाकडून दिले गेले आणि स्त्री-स्वातंत्र्याची चळवळ भरकटली आणि स्वातंत्र्याचे खरे मूल्य जाणणारी जी सक्षमता स्त्रियांमधे येणे अपेक्षित होते ती मागे पडली. स्वत:च्या क्षमता ओळखून त्या वाढविण्यासाठी प्रयत्न होण्याऐवजी पुरुषांच्या क्षमता शिरसावंद्य मानून त्यांचेच अनुकरण करण्यात शक्ती वाया गेली आणि त्याहीपेक्षा स्त्रीचे सामर्थ्य वाढवणे म्हणजे फक्त सौंदर्याची जोपासना करणे हा विचारप्रवाह दुर्दैवाने अधिक प्रबलित होत राहिला. फुले दांपत्याने 'स्त्री शिक्षण' हा स्त्री-सक्षमीकरणाचा पाया मानून तो भक्कम




बाईच्या संघर्षमय जगण्याचं चित्रण मराठी कादंबरीला नवं नाही. पण बायकांचा समूह मात्र क्वचितच कोणी रंगवला... एका लहानशा खेड्यातला बायकांचा समूह ओघवत्या भाषेत नि चित्रमय शैलीत रंगवणारी कादंबरी...

बाय गं...
सामान्य स्त्रीचे सामान्य जनजीवन

विद्या पोळ - जगताप

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

करण्यासाठी आपले आयुष्य वेचले; परंतु शिक्षित झालेल्या स्त्रियांनी त्याचा उपयोग खरोखरच स्वत:ची अस्मिता टिकवणे, वैचारिक उंची वाढवणे, ज्ञानवृद्धी यासाठी केला आहे का? या प्रश्नांना डोळसपणे भिडण्याची आज गरज निर्माण झाली आहे. तसेच समाज म्हणून विचार करताना ज्यांनी खरोखर या वाटा चोखाळण्याचे धाडस दाखवले आहे त्या स्त्रियांचे सामाजिक स्थानही तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. आजचा आधुनिक म्हणवणारा समाज सामाजिक अभिसरणामध्ये त्या स्त्रियांना कितपत सामावून घेऊ शकतो आणि त्यासाठी सामाजिक संरचनेमध्ये काय बदल घडवून आणू शकतो यावरही साकल्याने विचार आणि त्या दृष्टीने बदल करण्याची वेळ आलेली आहे. तो तसा व्हावा किंवा किमान त्या दिशेने बदलास सुरुवात व्हावी या उद्देशाने कादंबरी आकारास आली.

ही कादंबरी घडताना स्त्रियांच्या मागच्या तीन पिढ्यांचा आणि किमान पन्नास साठ वर्षांच्या काळातील बदलांचा प्रदीर्घ पट मांडावयाचा होता. या सर्व काळातील अनेक प्रकारच्या, वेगवेगळ्या सामाजिक स्तरांतील स्त्री व्यक्तिरेखा कादंबरीत भेटत जातात. वाचताना या प्रत्येक व्यक्तिरेखेचे वेगळे जगणे, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि विचारांचे वेगळेपण ठळकपणे लक्षात येईल. त्यांच्या कथाही वेगवेगळ्या आहेत, त्यांचे अनुभव, घटनांचे त्यांच्यावर होणारे परिणाम, वागणे, बोलणे सगळेच वेगवेगळे आहे, या अनेक पात्रांना एका कथासूत्रात सुसंबद्धपणे बांधून, त्यांचे परस्पर नातेसंबंध गुंफताना आणि त्यांना आलेल्या सर्व प्रकारच्या समस्यांचा ऊहापोह करतानाच तत्कालीन सामाजिक चौकट सांभाळून त्यावर त्यांनी केलेले उपाय, विचारविनिमय, समाजाने त्यांना पुरवलेली उत्तरे आणि त्यातून बदलत गेलेले स्त्रीजीवन साकारले आहे. हे सर्व मांडत असताना लेखनप्रकाराची एक वेगळीच कसरत या कादंबरीत करावी लागली आहे. त्यामुळे कादंबरी या साहित्यप्रकाराची पारंपरिक ठेवण, बांधणी बरीच बदलली आहे, हे वाचकांच्या लक्षात येईलच. स्त्रियांच्या कित्येक पिढ्यांसोबत अपरिहार्यपणे जोडल्या गेलेल्या परंपरा, रिती-रिवाज, जीवनपद्धती, त्यातून निर्माण झालेले लोककाव्य, काही ग्रामीण शब्दालंकार, हेदेखील कुठेतरी नोंदवले जावे आणि टिकवले जावे; हाही उद्देश या निमित्ताने साध्य करता आला आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मागच्या काहीशे वर्षांच्या वाङ्मयीन प्रवाहात ज्याची कुठेच नोंद घेतली गेली नाही, ते 'सामान्य स्त्रीचे सामान्य जीवन' या कादंबरीच्या निमित्ताने कालपटलावर कायमचे कोरता आले; याचे समाधान लेखक म्हणून मला जास्त महत्त्वाचे वाटते.



***विद्या पोळ - जगताप***, ९०११२६७८६३

## । श्रद्धांजली ।

क्रीडा पत्रकारितेला आपल्या खुमासदार शैलीने वेगळा आयाम देणारे क्रीडा समीक्षक, सिनेनिवेदक द्वारकानाथ संझगिरी यांचे ६ फेब्रुवारी रोजी दीर्घ आजाराने दु:खद निधन झाले.

गेली पाच दशके आपल्या ओघवत्या आणि सौंदर्यपूर्ण लेखनशैलीने



आणि निवेदनाने क्रीडा, नाट्य, चित्रपट या क्षेत्रांतील रसिकांच्या मनावर त्यांनी आपली मुद्रा उमटवली आहे. 'आम्हाला वगळा...' हे त्यांचे सिनेकलावंतांची अनोखी ओळख करून देणारे पुस्तक राजहंसने प्रकाशित केले आहे.

राजहंस परिवारातर्फे **द्वारकानाथ संझगिरी** यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## । श्रद्धांजली ।

बालसाहित्यकार म्हणून विशेष ओळख असणारे, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक, वृत्तनिवेदक, पत्रकार, वक्ते प्रा. अनंत भावे यांचे २३ फेब्रुवारी रोजी दु:खद निधन झाले.



'माणूस' साप्ताहिकातील त्यांचे 'सोल कढी' हे स्तंभलेखन विशेष गाजले होते. राजहंसने त्यांचे 'गरागरा गरागरा', 'टंगळ-मंगळ' हे बालसाहित्य प्रकाशित केले आहे.

माणूसप्रिय, मिश्कील स्वभावाचे एक उमदे व्यक्तिमत्त्व असणाऱ्या **अनंत भावे** यांना राजहंस परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

# आठवणींचा पारिजात
## सोयरे जिवलग

टांगा त्या हलक्याशा चढावर हळूहळू जायचा. मग घोड्याच्या टापा थांबायच्या. मावशी... सुखाताई... असं ओरडत मी उड्या मारत आत जायचे. मावशी चटकन काहीतरी म्हणायची. 'सोने, उंच झालीस की...' किंवा 'केस कापले...?' डोळ्यांत प्रचंड कौतुक आणि माया... मला सुट्टीसाठी मावशीकडे सोडायला आई यायची. कधीकधी माझा मोठा भाऊ संदेशपण बरोबर असायचा.

ताईमावशी - आईची सगळ्यांत मोठी बहीण. तिचे मिस्टर फार लवकर गेले. त्यांचं आडनाव श्रीमंत. त्यांची राहणीही थाटाची होती म्हणे. माझी आई कॉलेजला असताना त्यांच्याकडे राहिली काही वर्षं. मावशीची मुलं - आबासाहेब, बाळासाहेब, बाबासाहेब, शशी आणि सुखदा. वयाने सगळे आईच्या आसपास. त्यांच्याकडे फळं कापून द्यायचे, टोमॅटोच्या फोडी खायला द्यायचे... ते आईला अजूनही आठवतं.

कॉलेजला जाईपर्यंत माझ्या सगळ्या सुट्ट्यांमध्ये मी मावशीकडे कोल्हापूरला जायचेच. पत्ता होता - मंगळवार पेठ, पद्माराजे गर्ल्स हायस्कूलजवळ. आजही कोणी डोळे बांधून मला रंकाळ्याजवळ किंवा अंबाबाईच्या देवळाजवळ सोडलं, तर मी बिनचूक मावशीच्या घरी येईन. मावशीच्या घराला छोट्या पायऱ्या... मग ओसरी. तिथे लाकडी चौकट आणि लोखंडी जाळी होती. उजवीकडे आबाण्णांची खोली. स्वच्छ आणि भरपूर प्रकाशाची. तिथे पांढरी फरशी होती. मग मोठा दिवाणखाना. तिथे आरसा होता... आणि आरशासमोर पावडरचा उंच डबा आणि पफ. मला त्या डब्याचं, त्या सुगंधाचं फार अप्रूप होतं. एक मोठी कॉट होती. वायरच्या खुर्च्या होत्या. लाकडी खिडक्यांना अर्धे पडदे होते. खूप वर्षांनी एका कोपऱ्यात टीव्ही स्थानापन्न झाला. मग छोटी कोठीची खोली होती. ती थंडगार असायची. त्याच्यापुढे स्वयंपाकघर. मावशीकडे ओटा नव्हता कधी. खाली बसून स्वयंपाक, जेवण.

सगळ्यात सुंदर होता न्हाणीघराचा चौक. त्याला छप्पर नव्हतं. तिथे एक फार सुंदर, मोठ्ठा तांब्याचा हंडा होता. पाणी गरम करायचा बंब होता. आणि गंमत म्हणजे तिथे बाहेर पडायला एक दार होतं. मी कितीतरी वेळा त्या दारातून मागच्या मोकळ्या रानात खेळायला जायचे. तिथे कडेला बोरीबाभळीची मोठ्ठाली झाडं होती. हलकासा पाऊस पडून गेला, की मऊ मातीच्या ढिगामध्ये नक्षी तयार व्हायची. त्याला आम्ही गणपती म्हणायचो.

मावशीकडे माझे फार लाड झाले. ती मला चित्रकला स्पर्धेला घेऊन जायची.

एकदा ज्योतिबाच्या डोंगरावरपण घेऊन गेली होती. बाळूदादा बँकेत कामाला होता. त्यामुळे सकाळी दहा वाजताच तो पानावर बसायचा. त्याच्या पंगतीला अनेकदा माझीही वर्णी लागायची. मावशीकडे कुठला तांदूळ होता कोण जाणे... पण त्या भाताचा घमघमाट सुटायचा आणि मावशीकडे माईनमुळ्याचं लोणचं असायचं. ते फार आवडायचं मला.

शशाक्काचा एक पाय जरा अधू होता. ती तशी लवकर गेली. पण मला आठवते ती. मला काहीतरी गाणं म्हणायला सांगायची. नाच करून दाखवायला सांगायची... मावशी जेवण झाल्यावर तिचे केस विंचरायला सांगायची. मला फार आवडायचं ते. रोज तेल लावलेले केस हाताला वेगळेच लागायचे. मग पाठीला पावडर लावून द्यायला सांगायची. तीन वाजले न वाजले, ठेवलाच मावशीने चहा. पांढऱ्या कपबश्यांमध्ये चहा घेऊन मी मावशीबरोबर रोज अंबाबाईच्या देवळात जायचे. मावशी फार काटक आणि नऊवारी साडी असूनही भराभरा चालायची. तिथे तिच्या ओळखीच्या चार बायका असायच्या. देवळात खेळून, दर्शन घेऊन आम्ही परत यायचो.

एकदा अंबाबाईचा रथ निघाला, तेव्हा मीपण नऊवारी नेसणार म्हणून बसले. मग फ्रॉकवरच मला साडी नेसवली आणि मग पद्माराजेच्या पुढे रात्री त्या गर्दीत मी मिरवणूक बघायला गेले होते. वारा घालायचा तो मशाली कंदील. मी गर्दीतली एक झाले होते.

पुढे कोपऱ्यावर एक बाग बनली. चारही बाजूंनी उघडी गटारं. बागेत जायला मजा यायची. तिथे एका गोलात वाळू होती. किल्ला करता यायचा, खणता यायचं. ती 'वाळूची बाग' म्हणूनच ओळखली जायला लागली. हायस्कूलमध्ये गेल्यावर मी आरशासमोर जास्त रमायला लागले. 'बाहेर जाताना केसाची बट काढायची असते'

अभिनंदन!

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे पुरस्कृत
शिवांजली प्रतिष्ठान संस्थेतर्फे



उत्कृष्ट बालकादंबरी
प्रथम पुरस्कार

**१६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!**



सुरेश वांदिले

असं म्हणाले एकदा! ते आठवून अजूनही सगळे जण हसतात.

मावशीच्या शेजारी लाड राहायचे. त्यांच्याकडे गुरं होती. त्यांची मुलगी आणि मी समवयस्क होतो. आम्ही एकत्र खेळायचो. मावशीकडे चाऱ्याचा, गोठ्याचा गंध यायचा. तो साहजिक वाटायचा. आमचे इतर बरेच नातेवाईक होते कोल्हापुरात. वेणूमावशी, सरलाताई, मामा-मामी... त्यांच्याकडे कधीकधी जायचो. विष्णू म्हणून एक भिकारी होता. तो पारावरून इकडेतिकडे जायचा. बसलेला असायचा. त्याच्या पाटाला चाकं होती. आबाण्णा शेतावरून परत आला, की आम्हाला छान-छान गोष्टी सांगायचा. कधी रहस्यमय, कधी विनोदी. तेव्हा ५ आणि १० पैशांना पेरिना आइसक्रीम मिळायचं. दुपारी छोट्या हातगाडीवर यायचं ते आणि आबाण्णा आम्हाला घेऊन द्यायचा ते. तो आम्हाला खूप हसवायचा.

हे लिहिताना तो काळ अनुभवल्यासारखा वाटतोय. ते गंध आसपास जाणवतायत. माझ्यावर या कुटुंबानं केलेली अपार माया, त्यांच्या नजरेतलं कौतुक जाणवतंय. कुठलाच हिशोब नव्हता. पण माझं बालपण किती समृद्ध झालं! केवढा शांतपणा होता त्या वातावरणात आणि घाई नव्हती. ती गती कुठे मिळेल का... जे मला मिळालं... ते कोणाला तरी मला देता येईल का...!

***सोनाली कुलकर्णी***


सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री.
सोनाली माणसांना वाचते आणि शब्दांतून
त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते.
अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला
पाहण्या-ऐकण्याएवढंच ‘वाचणं’ही किती लोभस
असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...




## सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## ‘स्त्री’संवेदनेला ‘राजहंसी’ कोंदण




आपला बहुतेकांचा भोवताल वरवर सारखाच आहे. तरीही प्रत्येकाचं प्राक्तन निराळं, निर्णय निराळे!
जितकी ‘उमजण्या’ची ताकद मोठी, तितकं आपलं ‘भंगणं’ अधिक! ‘उमजण्याच्या’ या खेळात म्हणूनच सोबत उरते एकाकीपणाची तीव्र संवेदना! जाणिवेच्या अथांग आकाशात झेप घेऊ पाहणारा प्रत्येक हंस अकेला आहे, तो या अर्थानंच!

### हंस अकेला

मेघना पेठे

आठवी आवृत्ती । किंमत : ₹ २३०/- । (ट.ख. ₹ ५०)

एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास चित्रित करणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी!

### ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

मृणालिनी चितळे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)






राजकारण आणि समाजकारण या दोन तलवारी एकाच म्यानात राहत नाहीत, हे वचन खोटं ठरवणाऱ्या कार्यकर्त्या. स्थानिक प्रश्नांवर काम करताना वैश्विक घडामोडींचं भान ठेवून उत्तरं शोधणाऱ्या नेत्या - नीलम गोऱ्हे.

### ऐसपैस गप्पा नीलमताईंशी

करुणा गोखले

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३६०/- । (ट. ख. ₹ ५०)

# क... कविता

## मराठी मनाच्या सर्जनशीलतेला पाऊलवाट देणारे सदर

### रुबाया

मी जाता जाता वाट जराशी चुकले
अन् वाटेवरल्या किती क्षणांना मुकले
जे हुकले त्यावर तुझे नसे रे नाव
पण मोडु नको तू भातुकलीचा डाव

—

जरि जुने वाटले जुनेच होते सारे
जरि मेघ दाटले पाणी नव्हते खारे
मी मौन पाळता लुकलुकले का तारे
जरि अतर्क्य जीवन सतर्क इथले वारे

—

पटताना ओळख अनोळखी मी व्हावे
असताना कंदिल काळोखातुन जावे
मृद्‌गंध घेउनी उनाड वाहे वारा
हातातुन माझ्या निसटुन जाई पारा

—

जर आतुन आले रोजच गावे गाणे
अन् नको वाटता सांगावेत बहाणे
या जगण्यावरती तुझी असे रे सत्ता
तू नकोस होऊ खेळामधला पत्ता

***दीपाली दातार***
९८५०३४८०८१

## खास बालवाचकांसाठी लिहिलेली 'राजहंसी' पुस्तके

मागवा खालीलपैकी १ पुस्तक किंवा ३ पुस्तके - ट.ख. ४०/-



भारतीय विद्यापीठातून विज्ञान विषयातली डॉक्टरेट मिळवणाऱ्या पहिल्या महिला. ज्या काळात विद्यापीठात प्रयोगशाळांमधल्या सुविधा अपुऱ्या होत्या; त्या काळात अपार कष्ट घेत, स्वत: पदरमोड करून औषधी वनस्पतिशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन करणाऱ्या वैज्ञानिकेची प्रेरक कहाणी.

### कर्मयोगिनी वैज्ञानिक असीमा चटर्जी

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ ८०/-

निसर्गातील सजीवांचे सहजीवन अथर्वने कसे समजून घेतले? त्याने कुठले पक्षी, प्राणी, कुठली झाडे एकमेकांना सोबत आणि मदत करताना पाहिले? चला, माहीत करून घेऊ या-

### निसर्गातले सखे - सोबती

मुग्धा शेवाळकर-मणेरीकर

किंमत : ₹ ८०/-





हिरवेगार वडगाव हळूहळू झाले उजाड.
पाण्याच्या टंचाईने बेजार.
गावकऱ्यांनी शोधला कोणता पर्याय?
आजीबाईंनी सांगितला कोणता उपाय?
चला, वाचू या...

### मंत्र निसर्गाचा

माधुरी तळवळकर

किंमत : ₹ ५०/-

# उद्‌गार

नियतकालिकांचे / समाजमाध्यमांचे अभिप्राय

## चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे

*हे पुस्तक जेवढं एका दिग्दर्शकाचं आहे, तेवढंच सबंध नाट्यसृष्टीचं आहे.*
*ते लेखकाचं, अभिनेत्याचं, निर्मात्याचंही आहे आणि*
*बॅकस्टेजवाल्यांचंसुद्धा तितकंच आहे.*

'चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे' हे पुस्तक वाचल्यावर मला दोन गोष्टींचा अभिमान वाटला. एक म्हणजे, मी मराठी नाटक करतो आणि दुसरं मी नाटकात आतडं गुंतलेल्या चंद्रकांत कुलकर्णींना ओळखतो. गालावर हात, खुर्चीवर थाट, भविष्याकडे नजर आणि आपण केंद्रबिंदू असल्याच्या थाटात फोटो असलेली असंख्य चरित्रं, नोंदी, आत्मस्तुतीपर पुस्तकं आपण पाहतो; पण नवख्या माणसाची हुरहुर डोळ्यांत घेऊन स्टेजवर चक्क खाली बसलेला स्वत:चा फोटो मुखपृष्ठावर लावायची कल्पना आणि धाडस त्यांनी केलं, याबद्दल त्यांचं अभिनंदन!

या पुस्तकाचे प्रामुख्याने तीन टप्पे आहेत. एका तरुण धडपड्या रंगकर्मीला, त्याच्या आंतरिक ऊर्जेला रंगभूमीची दिशा मिळण्याचा टप्पा; दुसरा, नाटक माध्यमावर हुकुमत मिळवताना नवनवीन शक्यता शोधण्याचा आणि त्या झपाटल्यासारख्या अमलात आणायचा टप्पा; आणि तिसरा, हे सगळं करत असताना आपल्यासारख्या इतर अनेकांना काम आणि प्रेरणा देण्याचा टप्पा. आज महाराष्ट्रातले आणि विशेषत: पुण्यामुंबईच्या बाहेरचे असंख्य रंगकर्मी या तीनपैकी एका टप्प्यामध्ये आहेत. त्यामुळे या पुस्तकाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, हे पुस्तक जेवढं एका दिग्दर्शकाचं आहे, तेवढंच सबंध नाट्यसृष्टीचं आहे. ते लेखकांचं, अभिनेत्याचं, निर्मात्यांचंही आहे आणि बॅकस्टेजवाल्यांचंसुद्धा तितकंच आहे. ऐंशी आणि नव्वदीच्या वेगानं बदलणाऱ्या दशकांमध्ये सिनेमा आणि टीव्ही यांची आक्रमणं परतून लावून मराठी रंगभूमी जिवंत ठेवणारे जे महत्त्वाचे शिलेदार

आहेत, ते सगळे तुम्हाला या पुस्तकात दिसतील. फक्त चंद्रकांत कुलकर्णीच नाही, तर अनेक संस्था, निर्माते, लेखक, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, अभिनेते हेही त्यांच्याबरोबर आहेत, ज्यांनी स्वतंत्रपणेसुद्धा कठीण काळात रंगभूमीची पताका खाली पडू दिली नाही.

याशिवाय वसंत कानेटकर ते स्वरा मोकाशी, मोहन वाघ ते दिलीप जाधव, भक्ती बर्वे ते मुक्ता बर्वे, अनंत अमेंबल ते प्रदीप मुळ्ये अशा सगळ्यांबरोबरच्या गेल्या चार दशकांच्या अर्थपूर्ण, नाट्यमय आणि महत्त्वाच्या नाट्यनोंदी या पुस्तकात आहेत. पण त्याआधी एक महत्त्वाची नोंद, ती म्हणजे हे पुस्तक जेवढं त्यांचं आहे, तेवढंच अजून एका माणसाचं आहे, ते म्हणजे लेखक प्रशांत दळवी यांचं. कारण हे सबंध पुस्तक संस्मरणीय होण्यामागे महत्त्वाचं कारण म्हणजे त्यांची मैत्री आणि त्या मैत्रीत असणारी 'सिक्युरिटी' तुम्हाला पदोपदी जाणवते. यशात वाटेकरी असतातच; पण जे कष्टात वाटेकरी असतात, ते कायम लक्षात राहतात. प्रशांत दळवी मला त्यांपैकी वाटतात. आपला दिग्दर्शक मित्र आपल्याला सोडून नाटक किंवा सिनेमा करतो तेव्हा कसं वाटतं, याचा अनुभव लेखक म्हणून मीही घेतलेला आहे, त्यामुळे 'ध्यानीमनी', 'चारचौघी', 'चाहूल' अशी 'आयकॉनिक' नाटकं लिहीत असतानासुद्धा मित्राला आपल्याच कल्पनांच्या दावणीला बांधून न ठेवता काम करायला मोकळीक देणं आणि या सबंध प्रवासात त्यांचा सदसद्विवेक बनून राहणं ही अत्यंत अवघड आणि महत्त्वाची कामगिरी त्यांनी केली आहे. त्याचं मोल मला पुस्तक वाचल्यानंतर खूप मोठं वाटतं.

अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हे पुस्तक स्थलांतराबद्दल आहे. आपल्या कक्षा रुंदावण्याबद्दल आहे, भवताल बदलण्याबद्दल आहे; आणि फक्त आपल्यापुरतंच नाही, तर आपल्यासोबत एका संपूर्ण समूहाला घेऊन इतक्या मोठ्या मायानगरीत स्थिरस्थावर होण्याबद्दलही आहे. ज्या शहरात जागा मिळवणं हेसुद्धा युद्ध आहे, तिथे स्थान निर्माण करण्याबद्दल हे पुस्तक आहे. आणि जेव्हा घर, परिवार, शहर हे वारशात मिळालेलं नसतं, तेव्हासुद्धा दीर्घकाळ चांगलं काम करता येतं याबद्दल आहे. हे मला महत्त्वाचं वाटतं.

सहजसोप्या आणि एका विलक्षण आवेगात लिहिलेल्या या पुस्तकातल्या सरांच्या व्यक्तिमत्त्वाइतकंच इतर वल्लींनीही मला 'फॅसिनेट' केलं. रुईया नाक्यावरचे 'एकांकिकेचा रिपोर्ट सॉलिड आहे!' म्हणणारे रुबाबदार महेश मांजरेकर, नाटकातली भिंत न तोडता चेंजिंग करायला वेळ घेणारे निरागस शिवाजी साटम, लांबी न पाहता कस्तुरबा साकारणाऱ्या करारी भक्ती बर्वे, वीस मिनिटांचा फोन कॉल रंगभूमीवर घणाणत ठेवणाऱ्या वंदना गुप्ते, पुलंना त्यांच्याच घरी जाऊन 'तुम्हीच मेन रोल करा' म्हणणारे सुधीर भट, 'पुढच्या ३१ डिसेंबरचं नाटक तू बसवणार' म्हणणारे

‘ओजी’ मोहन वाघ आणि अत्यंत मोक्याच्या क्षणी ‘वाडा चिरेबंदी’ करायला परवानगी देणारे धीरगंभीर महेश एलकुंचवार. अशा कितीतरी माणसांच्या लोभस छटा या पुस्तकात आहेत.

***क्षितिज पटवर्धन***

*(लोकसत्ता, ‘लोकरंग’ पुरवणी,* २ फेब्रुवारी २०२४मधून साभार)

---

## खांदे सुजलेले दिवस

साधारण २०००नंतरच्या काळात जागतिकीकरणाचे परिणाम अधिकच गडद होत गेले. भारतीय जीवनपद्धती या परिणामांना सरावली होती. ९०नंतरची मराठी कविता ही प्रामुख्याने जागतिकीकरणात होणारी पडझड व उलाघाल व्यक्त करणारी पडसादाची कविता होती. तीच कविता काही सकस कवींच्या लेखनात उत्तरोत्तर अधिक आशयनिष्ठ होत गेली. ज्येष्ठ कवी अशोक कोतवाल यांच्या ‘खांदे सुजलेले दिवस’ या अतिशय समर्पक शीर्षक असलेल्या संग्रहातील कविता वाचताना याचा अनुभव येतो. आपल्या भवतालात अस्वस्थता दाटली आहे. चराचरात हरवत जाणारी लय दिसत आहे. आयुष्यातली कोवळीक हरवून गेली आहे व समाजजीवनातील निरागसता लोप पावताना दिसत आहे. त्यानंतर सामोरे येणारे वर्तमान पेलताना संवेदनशील मन मिटून जाते. या दिवसांचा भार खांदे सुजवणारा आहे अशा प्रकारचे आशयसूत्र या कवितांमध्ये असले, तरी सर्व कवितांमध्ये वैविध्य आहे. कुठेही एकसुरीपणा नाही.

भवतालाचं भान राखत, निरीक्षणं नोंदवत
नाट्यकलेतील सर्जनप्रक्रिया मांडत
एका नाट्यकर्मी-दिग्दर्शकानं लिहिलेलं
हे नाट्यचरित्र. नाट्यकलेविषयी व्यापक दृष्टी देणारं,
विविधांगी अनुभवांचं संचित वाचकांपुढे ठेवणारं
हे पुस्तक.



चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे...

चंद्रकांत कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)

‘रथ ओढणारे लोक’ या पहिल्याच कवितेत एक मूलगामी भाष्य आहे. ‘रथांच्या घोड्यांना दृष्टी असतेच कुठे? नजर असते सरळ रेषेत चालणारी’ अशा शब्दांत कवीने ते व्यक्त केले आहे. त्यातून प्रतीत होणारा आशय व अनेकार्थ या दृष्टीने या कविता महत्त्वाच्या आहेत.

*‘मध्यरात्री ऐकू येतो मला*
*एक महाकरुण ध्वनी*
*आणि हळूहळू युद्धाकडे सरकू लागतो’*

कवी फक्त भोवतालावर बोलत नाही, तर आपल्या आतल्या आवाजाची दखल घेतो. समकाळात होत असणाऱ्या आघातांबरोबर मन बधिर होते. आतून विस्कटलेपण येते. त्याचे दर्शन घडवणारे व त्यातून पुन्हा सावरणारे मन अशा दोन्ही प्रकारचे विचार इथे दिसतात. ते अतिशय भेदक व नेमक्या शब्दांतून कवीने समोर ठेवले आहेत. अनेक कवितांतून समकाळावर केलेले भेदक भाष्य आहे. या कवितांची शैली थेट आहे. कमी शब्दांत आशय मांडणारी शैली हा चांगल्या कवितेचा ठळक विशेष इथे प्रामुख्याने जाणवतो. काही ठिकाणी कवीने एखादी थीम वापरली आहे. त्याचा कुठेच उल्लेख न करता, पण आशयघन निर्मिती करत ही कविता पुढे जाते. उदाहरणार्थ, ‘राजा रडला’ ही कविता. ‘राजा रडला कुणी रडवले’ या विवंचनेत असलेली प्रजाही ढसाढसा रडू लागते. ‘राजा रडला’ या कवितेचा उत्तरार्ध वाटावा अशी महाचर्चा ही कविता तर सद्य:स्थितीत खोल भाष्य करणारी आहे.

या संग्रहामध्ये एक वेगळा विभाग ठरावा अशा विठ्ठलावरच्या कविता अतिशय महत्त्वाच्या व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या विठ्ठलाचे परंपरागत रूप दाखवणाऱ्या नाहीत, तर त्यापलीकडे तटस्थ चिकित्सा करणाऱ्या व विठ्ठल आणि त्याचे साधेसुधे भक्त यांच्या नात्यांचा वेध घेणाऱ्या आहेत. ‘रखुमाईचे आर्जव’पासून ही कवितांची मालिका सुरू होते. ती म्हणते, *‘मला हे लादलेले देवपण नकोय, तर मला बाईपण दे. दगडी काळोखात जीव गुदमरतोय माझा. मला माझी षड्‌विकारी काया दे.’* अशा समर्पक शब्दांत ही कविता परिणामकारक ठरते. पुढे ती विठ्ठलाला काही प्रश्न विचारते. ‘मी एका नजरेलाही पारखी असताना वामांगी कशी?’ थेट व भेदक प्रतिमा या सर्वच कवितांमध्ये दिसतात. ‘दिंड्या निघून गेल्यानंतरची चंद्रभागा लक्तरे पांघरून विठ्ठलाच्या दारी जाते.’ दिंडी झाल्यानंतर अवकळा आलेले तिथले वातावरण, तिथले उन्मादी भक्त यांवरती भेदक भाष्य आपले मन अस्वस्थ करते. ‘विठ्ठल आणि कुणबिणी’, ‘पंढरपुरात’, ‘पंढरीचा कुकू बुक्का’, ‘तो काळा नाही साधा भोळा’ अशा अनेक कवितांतून विठ्ठलाचं त्याच्या साध्या-सरळ भक्तांच्या मनात असलेले रूप रेखले आहे.

‘खांदे सुजलेले दिवस’ हे संग्रहाचे शीर्षकच या समकाळाचे ताण, त्यातून निर्माण झालेले जडशीळ प्रश्न व त्यांचा भार, त्यातून येणारी हतबलता प्रतीत करणारे आहे.

आजच्या वर्तमानात मनात उठलेला कल्लोळ व साचलेला, दाबून ठेवलेला आकांत संयतपणे प्रकट होतो, पण तरीही त्याचा परिणाम तीक्ष्ण आहे.

'मला व्हायचंय एक अनाम प्रश्नचिन्ह माझ्या समकाळावर उमटलेलं' अशा शब्दांत ते व्यक्त होते. हे कवीचे अस्वस्थपण दुहेरी आहे. 'खाता येत नाही कविता भाकरीसारखी', 'कवितेतली गायब झालेली ओळ' अशा अनेक प्रतिमा वेधक आहेत. 'तुकाराम' ही लहानशी पण अत्यंत आशयपूर्ण कविता आहे.

*'मला प्रचंड भूक लागते*
*तेव्हा मी भाकरीसारखा*
*तोडून खातो तुकाराम...'* कवीची भूमिका व त्याच्या आशयनिष्ठ शैलीचे दर्शन घडवणारी ही कविता आहे. काळजातून ठणक निघून कागदावर जाऊन बसलेली ही कविता मन अस्वस्थ करते.

***प्रा. सुजाता राऊत***

(*सामना, 'संवाद' पुरवणी,* २६ जानेवारी २०२४मधून साभार)


भयकंपित करणारे बदल अन् बाजारीकरण यांतून निर्माण झालेल्या शोषणाच्या नवनव्या तऱ्हांनी बरबटलेला जडशीळ भोवताल पेलता पेलता घायाळ झालेला समकाळ म्हणजे हा कवितासंग्रह.



## खांदे सुजलेले दिवस

अशोक कोतवाल

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



नोकरी मागणारा नव्हे, तर अनेकांना नोकरी देणारा तरुण उद्योजक. विकासाचा वसा घेतलेल्या हणमंतराव गायकवाडांची अन् 'भारत विकास ग्रुप'ची कहाणी!




## असाही एक किमयागार

अंजली ठाकूर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)

## ‘राजहंसी’ विविधा




मुलीचं लग्न होतं, तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं; हे सर्वमान्य! पण ती एकटीनं, स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेते, तेव्हा? तिचं जीवन कसं बदलतं? काय होतं? स्वत:च्या निर्णयानं, स्वतंत्रपणे, एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन.

### विवाह नाकारताना

विनया खडपेकर

किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)

विविध क्षेत्रांत लखलखीत कामगिरी केलेल्या अनेक वलयांकितांची शब्दचित्रे म्हणजे वाचकांसाठी एक संपन्न मैफीलच!

### राग दरबारी

काही वलयांकित गाठी भेटी

शोभा बोंद्रे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)







स्त्रीच्या अंगभूत गुणवत्तेविषयी जाणण्यासाठी आणि स्त्री तिच्या स्वत:च्या स्त्रीजातीच्या सोबतीचा, कायद्याचा, नव्या सामाजिक धोरणांचा उपयोग कसा करून घेते, हे पाहण्यासाठी अवश्य वाचावे असे हे पुस्तक...

### पुन्हा एकदा ‘स्त्री-पुरुष तुलना’

मंगला आठलेकर

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी पार

## काय घडलं ‘राजहंसी’ नगरीत?

### ‘देहभान’ : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून प्रशांत दीक्षित, विशाखा पाटील, दिलीप माजगावकर,
निरंजन मेढेकर आणि मोहिनी मेढेकर

निरंजन मेढेकर लिखित ‘देहभान’ या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन नुकतेच पुण्यात झाले. या प्रसंगी राजहंसचे संचालक मा. दिलीप माजगावकर, संपादक प्रशांत दीक्षित, विशाखा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

‘लैंगिकता’ या विषयातील सूक्ष्म व अव्यक्त जाणिवांचा वेध घेणारे, संतुलित सहजीवनाचा मूलमंत्र सांगत त्यासंबंधीच्या मूलभूत प्रश्नांचा या विषयातील तज्ज्ञ, समुपदेशक आदींशी संवाद साधून लिहिलेले हे पुस्तक राजहंसकडून प्रकाशित होत आहे याबद्दल विशाखा पाटील व निरंजन मेढेकर यांनी या प्रसंगी आनंद व्यक्त केला.

❖

## ‘राजहंसी’ विविधा




त्यानं मातीतून रंग शोधले... शेंगदाणा-रताळ्यापासून चिकन-शाई-कॉफी-साबण-कागद बनवले... सोयाबीनपासून मोटारींसाठी सुटे भाग घडवले... असा हा मुलखावेगळा कार्व्हर या पुस्तकातून तुम्हांला भेटेल.

### किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर । चित्रे : माधुरी पुरंदरे

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

डोरोथी, कॅथरीन आणि मेरी - तीन आफ्रो-अमेरिकन गणितज्ञ महिला. ज्ञानाच्या आणि कर्तृत्वाच्या पंखांच्या सामर्थ्याने पायातले साखळदंड तोडून टाकून स्वत:चे मोकळे आकाश निर्माण करणाऱ्या

### तीन होत्या पक्षिणी त्या...

रविन्द्र जातेगांवकर

सहलेखिका : मधुमंजिरी गटणे

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)







हे नेहमीच्या अर्थानं प्रवासवर्णन नाही. निरनिराळ्या देशांच्या वर्तमान आणि भूगोल यांचा वेध घेत केलेला हा मनोज्ञ लेखनप्रपंच. आपली अनुभवश्रीमंती वाचकांमध्ये वाटून घ्यावी एवढ्याच उद्देशाने साधलेला हा सहजसंवाद.

### पाहिलेले देश भेटलेली माणसे

मंगला नारळीकर

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## किमयागार कार्व्हर

आदरणीय वीणाआजी गवाणकर,

सप्रेम नमस्कार.

कालच मी आपले ‘किमयागार कार्व्हर’ हे पुस्तक वाचून संपवले. मी ‘एक होता कार्व्हर’ हे पुस्तकपण वाचले आहे. ‘किमयागार कार्व्हर’मधील आपली रसाळ भाषा मला फारच आवडली. हे पुस्तक रंगीत चित्रांचे असल्याने ते वाचताना मला मजापण आली. ‘एक होता कार्व्हर’ हे पुस्तक मोठ्या वाचकांसाठी आहे व ‘किमयागार कार्व्हर’ किशोर वाचकांसाठी. मी ही दोन्ही पुस्तके वाचली असल्याने मला लहान मुलांसाठी केलेले बदल लगेच लक्षात येत होते. मला कार्व्हरच्या चरित्रातली एक गोष्ट खूप आवडली, ती म्हणजे तो अनेक क्षेत्रांमध्ये पारंगत होता. त्याला हवी ती नोकरी किंवा व्यवसाय सहज करता येत होता. पण त्याने आपल्या नीग्रो बांधवांसाठी कृषिविज्ञानाचा मार्ग निवडला व खूप कष्ट घेतले. कार्व्हरचे चरित्र मला फारच प्रेरणादायी वाटते.

आमच्या घरात खूप सारी पुस्तके असल्याने मी ती नेहमी वाचत असतो. आपली इतरही पुस्तके मी वाचायचे ठरवले आहे. आपण आमच्यासाठी अशीच छानछान पुस्तके लिहीत राहा.

आपल्याला पुन्हा एकदा नमस्कार करतो.

आपलाच


**_परीस खाडे_**, (इयत्ता आठवी)
न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्यु. कॉलेज
बारागाव, पिंप्री
ता. सिन्नर, जि. नाशिक

# गोंदणखुणा

'गोंदणखुणा' या नादमय शीर्षकानेच अलवार साहित्याची मेजवानी मिळणार हा विश्वास हे पुस्तक सार्थ ठरवतं. ललितलेखांचा हा खजिना जणू शब्दफुलं ओवून पुस्तकरूपात वाचकांच्या हाती आला आहे.

'राजहंस प्रकाशन'ची वाचनसुलभता दर्जेदार आहे, हे वेगळं सांगावयास नको. पुस्तकाचं मुखपृष्ठ हिरवट 'गोंदण-भाव' जपणाऱ्या पुंजक्यांनी गहिरं झालं आहे.

लेखिकेचं बालपण खेड्यात गेल्यानं लेखणीस रानवाटांचा गंध लाभला आहे, अर्थात त्यांची संवेदनशील तरलता, अभ्यास-चिंतन व शब्दसौंदर्य यांची पखरण पुस्तकभर आहे. छोटे-छोटे 'लेख झुले' वाचकांना त्यांच्या आनंद-आठवणींशी एकरूप होण्यास मदत करतात. रांगोळी ज्याप्रमाणे घराचं सौंदर्य जपते, त्याप्रमाणे कथांची शीर्षकं (भावसखी बाभूळ, काळीजओली ओढ, पत्राची स्नेहबोली) वाचकांचं स्वागत करतात. काळ-कुपीत तळाशी गेलेल्या काही शब्दांचा (दिठी, थारोळं..) वाचकांना गुगल-मागोवा घेण्यास आवडेल... इतकंच नव्हे, तर लेखिकेनं नव्या शब्दांचा साजही चढवला आहे. (जिवटपण, चित्रवीणा, लोचनकडा, उन्हेरी, प्रवासताना)

आधुनिक सुविधांची नजर लागल्याचे प्रसंग येथेही आलेत, पण नजरेआड झालेल्या सुखसोहळ्यांचं पारडं अधिक आहे, हे नक्की! काळाबरोबर धावताना जगण्याभोवतीचे चांगले-वाईट क्षण 'जाणिवेच्या डोळ्यांनी निरखण्यास' (लेखिकेच्या शब्दांची मदत घेऊन...) हे पुस्तक शिकवतं. लेखिकेच्या सुरावट लेखणीने साकारलेले हे लेखन चिरकाल आनंद देणारे आहे.

***विजय भोसले***, नवी मुंबई




निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार,
मानवी स्वभावातील भावनाट्य,
कवितेचा रुणझुणता चरण
यावरील आत्मचिंतनातून आलेले लेख

## गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

## फकिरी

'फकिरी' एक आठवड्यात वाचून पुरी केली - नव्हे अभ्यासली! आपले जीवन अफलातून आहे. आपण उभयतांनी सेवेचा एक आदर्श निर्माण केला आहे. अधिक अभिनंदनीय आहे, पुढच्या पिढीचा अशा नि:स्वार्थ सेवाकार्यातील सहभाग. मी आपल्याकडे येऊन आपले कार्य पाहिले आहे. पण पुस्तक वाचून खूप तपशील माहिती झाले. त्यामुळे आपल्या कामाचे महत्त्व व महत्ता अधिक जाणवले. समाजासाठी हा प्रकल्प दीपस्तंभासारखा आहे. त्यामुळेच समाजाकडून सहकार्य मिळते व मिळत राहील. माझाही तो अनुभव आहे.

न त्वहम् कामये राज्यं न स्वर्गं न पुनर्भवम्।  
कामये दु:खतप्तानां प्राणिनाम् आर्तिनाशनम्।।

- राजा रतीदेव

या वर्णनाचे आपण जितेजागते उदाहरण आहात. शुभेच्छा.

***अशोक कुकडे***, लातूर

---

## सीता

आज लक्ष्मीपूजनाच्या दिवशी 'सीता' ही राजहंस प्रकाशनाने प्रसिद्ध केलेली कादंबरी वाचून पूर्ण केली. तशी मी ही कादंबरी याआधी वाचली होती. आणि तेव्हाच ठरवले होते की लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हे सीतास्तवन पुन्हा वाचायचे. सध्याच्या सेवाक्षेत्राच्या प्राबल्याच्या जमान्यात लक्ष्मीसाठी सरस्वती अत्यावश्यक आहे


एका सर्वसामान्य माणसाचा अनघड प्रवास. अनेकांना अडचणीतून मार्ग दाखवणारा, दिशाहीन वा नाउमेद झालेल्या तरुणाईला दिलासा मिळेल या विश्वासाने केलेला...



फकिरी

एक अनघड प्रवास...

दत्ता बारगजे

किंमत : ₹ ३९५/- । (ट. ख. ₹ ५०)

आणि सरस्वती व लक्ष्मी यांचे परस्पर-पूरक आणि परस्पर-प्रेरक एकत्रित रूप म्हणजे सीता अशी माझी धारणा आहे. तुमच्या या कादंबरीने माझी ही मनोधारणा अधोरेखित झाली.

तुमची ही कादंबरी अतिशय संवादप्रधान आहे. आधीच्या पिढीतील प्रसिद्ध नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांची एखादी नाट्य-संहिता वाचत असल्याचा भास तुमची ही कादंबरी वाचत असताना मला सतत होत होता.

तुमच्या या पुस्तकातील दोन वाक्ये माझ्या मनात कायमची घर करून बसली आहेत.

पहिले वाक्य म्हणजे 'न बोलताही काय सांगायचे हे तिला उमगू लागले आहे.'

आणि

दुसरे वाक्य म्हणजे 'सीतेचा / 'तिचा डोहच वेगळा होता.'

'तिचा डोहच वेगळा' हे एक वाक्य या संपूर्ण कादंबरीचा आवाका - आशय - अभिव्यक्ती सांगून जाते...

एक सुचवू का?

'तिचा डोहच वेगळा' हे वाक्य या पुस्तकाचे उपशीर्षक म्हणून घ्या ना!

***चन्द्रशेखर टिळक***, डोंबिवली

---

## तीन होत्या पक्षिणी त्या...

रवी,

तुझे पुस्तक आत्ताच हातावेगळे केले. पुस्तकाचे नाव सार्थ करणाऱ्या अशाच त्या 'पक्षिणी'. त्यांच्या बौद्धिक आणि जिद्दी कुवतीमुळे अमेरिकेच्या





कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या
विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...

सीता

अभिराम भडकमकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३७५/- । (ट.ख. ₹ ५०)

आकाशात नव्हे अवकाशात विहरत असताना, गोरे आणि गौरेतर यांच्यात त्या वेळी असणाऱ्या संघर्षाला कसे तोंड देत, स्वत:ची आणि गौरेतर समाजाची कशी उन्नती करून घेतात हे वाचताना खरेच अंगावर काटा उभा राहतो.

छोट्या छोट्या गोष्टींतसुद्धा त्या शांतपणे पण धीराने आपल्या उद्दिष्टाकडे कशा पोहोचतात याची ही कहाणी. कहाणी कथन करताना आजूबाजूच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन संयमाने करत पक्षिणीचे कार्य अधोरेखित केले आहे.

सगळे तांत्रिक शब्द असताना वाचन क्लिष्ट होणार नाही याकडे दुर्लक्ष झाले नाही. वाचकाला भौगोलिक परिस्थितीचे आकलन होईल अशा रितीने लिखाण झाले आहे. तुझ्या सहलेखिकेचेसुद्धा अभिनंदन. त्यांनी उत्तमरीत्या भाषांतर केले आहे. तुझ्या गणित विषयाच्या आवडीचा सार्थ उल्लेख त्यांनी त्यांच्या मनोगतात केला आहे.

एकूण क्लिष्ट विषय आणि सामाजिक विषयाची सांगड घालून त्या तिन्ही पक्षिणींची 'कार्यावकाशाची सफर' (हा शब्द तुझ्या सहलेखिकेचा) छानच जमली आहे. तुझ्या मराठी निबंधातील कौशल्य परत जाणवले. असेच लिखाण परत परत वाचायला मिळो ही इच्छा.

हे तुझ्या पुस्तकाचे समीक्षण नाही, पण मित्राच्या कलाकृतीचे मनापासून कौतुक मात्र आहे.

***प्रकाश करंडे***

**मुखपृष्ठ, मुखपृष्ठाच्या व मलपृष्ठाच्या आतील पानांवरील पुस्तकांविषयी**

- ६४ घरांच्या गोष्टी — किंमत : ₹ ४७५/-
  रघुनंदन गोखले
- देहभान — किंमत : ₹ २५०/-
  निरंजन मेढेकर
- छोट्यांचा मोठा प्लॅन आणि इतर गोष्टी — किंमत : ₹ ७०/-
  मुग्धा शेवाळकर
- स्कालपेल ते स्कोपी ते रोबो — किंमत : ₹ ३५०/-
  डॉ. चित्रलेखा पुरंदरे
- एका युरोलॉजिस्टची वाटचाल — किंमत : ₹ ४५०/-
  शिल्पा शिवलकर

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**‘राजहंस ॲप’**

App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play
ॲन्ड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com I Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अद्रुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.




ही कहाणी आहे एका आधुनिक सुश्रुताची...
तसंच हा आहे 'पुणे टेक्निक' हे नवं शल्यतंत्र
विकसित करणाऱ्या सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक
डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या अनोख्या
प्रवासाचा घेतलेला वेध...

## स्कालपेल ते स्कोपी ते रोबो

डॉ. चित्रलेखा पुरंदरे

---

हा आहे -
युरोलॉजिस्टांच्या चार पिढ्या घडविणाऱ्या
डॉ. शरद बापट यांचा प्रेरक जीवन प्रवास...
तसंच भारतातील 'युरोलॉजी' या
वैद्यकीय शाखेच्या वाटचालीचा आणि
या क्षेत्रातील ६० वर्षांतल्या अचाट तांत्रिक
प्रगतीचा आलेख...

## एका यशस्वी युरोलॉजिस्टची वाटचाल

संकल्पना आणि लेखन
शिल्पा शिवलकर



Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post



# सामाईक वापर आणि पुनर्वापर

## सायकल बँक! बुक बँक! साडी बँक!



आपल्याकडील जुनी, विनावापर पडून असलेली सायकल, पुस्तकं किंवा साड्या आम्हाला हव्या आहेत.







- आजही ग्रामीण व दुर्गम भागातले अनेक विद्यार्थी परिस्थितीअभावी बस वा अन्य कोणताही वाहतुकीचा पर्याय निवडू शकत नाहीत. त्यामुळे दूरवर असलेल्या शाळेत रोज त्यांना पायी जावं लागत आहे. आपल्याकडे असणारी जुनी आणि वापरात नसलेली सायकल या विद्यार्थ्यांच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकते. त्यासाठीच आपल्याकडील जुनी, विनावापर पडून असलेली सायकल आम्हाला हवी आहे.
- आपण आम्हाला दिलेली ही सायकल आम्ही गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवू! • **सायकल भेट देण्यासाठी संपर्क : 73783 78989/ 99223 83341**

## परिस्थितीवर मात करून आयुष्यात मोठा बदल घडविण्यासाठी

- सामाईक वापर (शेअर) केल्याने स्रोत वाढतात. कुटुंब, मित्र व समाज यासमवेत साधनांची देवाण-घेवाण व सामाईक वापर करा, यातूनच उपलब्ध साधन-स्रोतांची वाढ होत राहील.
- उपभोगाचे रूपांतर सहभागात होते. व्यवहारावासात रूपांतर होते. ही आपली भेट केवळ वस्तूंची, पैशांची वा एखाद्या सेवेची नसून, प्रेमाची व कृतज्ञतेची देवाण-घेवाण आहे.
- आपल्या घरातील वापरात नसलेल्या सुस्थितीतील वस्तू 'सद्गुरू सेवा प्रतिष्ठान'कडे जमा करा आणि गरजवंतांना मदत करा .

**REDUSE**
**REUSE**
**RECYCLE**

## सद्गुरू सेवा प्रतिष्ठान

सत्कर्मी रती वाढो

- नोंदणी क्रमांक - महाराष्ट्र /४१६/२०२१/(पुणे)
- ट्रस्ट रजि. नं. - एफ - ५६३२७/ पुणे
- 80G: ABNAS7596NF20224

६७/३, ज्ञानेश सोसायटी,
वारजे माळवाडी, पुणे - ४११ ०५८
sachinmhase@gmail. com
www.sadgurusevapratishthan.org
+91 73783 78989, 99223 83341

आमच्या फेसबुक पेजला भेट देण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**